गोपिकांचे । आणीक लोकांचे गोकुळींच्या ॥ १४ ॥ गोकुळींच्या लोकां
लावियेला छंद । बैसला गोविंद यांचे चित्तीं ॥ १५ ॥ चित्तें हीं चोरूनी
घेतलीं सकळा । आवडी गोपाळांवरी तयां ॥ १६ ॥ तयांसी आवडे वैकुं-
ठनायक । गेलीं सकळींक विसरोनी ॥ १७ ॥ निंदा स्तुति कोणी न करी
कोणाची । नाहीं या देहाची शुद्धि कोणा ॥ १८ ॥ कोणासी नाठवे कन्या
पुत्र माया । देव ह्मणुनि तया चुंबन देती ॥ १९ ॥ देती या टाकून भ्रता-
रासी घरीं । लाज ते अंतरीं आथीच ना ॥ २० ॥ नाहीं कोणा धाक
कोणासी कोणाचा । तुका ह्मणे वाचा काया मनें ॥ २१ ॥

॥ ६६७८ ॥ मनें हरिरूपीं गुंतल्या वासना । उदास या सुना गौळि-
यांच्या ॥ १ ॥ यांच्या भ्रतारांचीं धरूनियां रूपें । त्यांच्या घरीं त्यांपें
भोग करी ॥ २ ॥ करी कवतुक त्याचे तयापरी । एकां दिसे हरि एकां लेंक
॥ ३ ॥ एक भाव नाहीं सकळांच्या चित्तीं । ह्मणऊनि प्रीति तैसें रूप
॥ ४ ॥ रूप याचें आहे अवघींचि एक । परि कवतुक दाखविलें ॥ ५ ॥ लें-
करूं न कळे स्थूल कीं लहान । खेळे नारायण कवतुकें ॥ ६ ॥ कवतुक
केलें सोंग बहुरूप । तुका ह्मणे बाप जगाचा हा ॥ ७ ॥

॥ ६६७९ ॥ जगाचा हा बाप दाखविलें माये । माती खातां जाये मा-
रावया ॥ १ ॥ मारावया तिणें उगारिली काठी । भुवनें या पोटीं चौदा
देखे ॥ २ ॥ देखे भयानक झांकियले डोळे । मागुता तो खेळे तियेपुढें
॥ ३ ॥ पुढें रिघोनियां घाली गळां कव । कळों नेदी माव मायावंत ॥ ४ ॥
मायावंत विश्वरूप काय जाणे । माझें माझें ह्मणे बाळ देवा ॥ ५ ॥ बाळ-
पणीं रिठा रगडिला दाढे । मारियेले गाढे कागबग ॥ ६ ॥ गळां बांधवूनी
उखळासीं दावें । उन्मळी त्या भावें यमळार्जुन ॥ ७ ॥ न कळे जुनाट ज-
गाचा जीवन । घातलें मोहन गौळियांसी ॥ ८ ॥ सिंकीं उतरूनी खाय नव-
नीत । न कळे बहुत होय तरी ॥ ९ ॥ तरीं दुधें डेरे भरले रांजण । खाय ते
भरून दावी दुणी ॥ १० ॥ दूणी झालें त्याचा मानिती संतोष । दुभत्याची
आस धरूनियां ॥ ११ ॥ आशाबद्धा देव असोनी जवळी । नेणती ते काळीं
स्वार्थामुळें ॥ १२ ॥ मुळें याच देव न कळे तयासी । चित्त आशापाशीं गो-
वियेलें ॥ १३ ॥ लेंकरूं आमुचें ह्मणे दसवंती । नंदाचिये चित्तीं तोचि भाव
॥ १४ ॥ भाव जाणावया चरित्र दाखवी । घुसळितां रवि डेरियांत ॥ १४ ॥
डेरियांत लोणी खादलें रिघोनी । पाहे तों जननी हातीं लागे ॥ १६ ॥ हा-

तीं धरूनियां काढिला बाहेरी । देखोनियां करी चोज त्यासी ॥ १७ ॥ सिकवी विचार नेणे त्याची गती । होता कोणे रीती डेरियांत ॥ १८ ॥ यांसी पुत्रलोभें न कळे हा भाव । कळों नेदी माव देव त्यासी ॥ १९ ॥ त्यांसी मायामोहजाळ घाली फांसा । देव आपणसा कळों नेदी ॥ २० ॥ नेदी भाव राहों लोभिकांचे चित्तीं । जाणतांचि होती अंधळीं तीं ॥ २१ ॥ अंधळीं तीं तुका ह्मणे संवसारीं । जिहीं नाहीं हरि ओळखिला ॥ २२ ॥

॥ ६६८० ॥ ओळखी तयांसी होय एकाभावें । दुसरिया देवें न पविजे ॥ १ ॥ न पविजे कदा उन्मत्त झालिया । दंभ तोचि वांया नागवण ॥ २ ॥ वनवास देवाकारणें एकांत । करावीं हीं व्रततपें याग ॥ ३ ॥ व्रत याग यांसीं फळलीं बहुतें । होतीं या संचितें गौळियांचीं ॥ ४ ॥ यांसी देवें तारियेलें न कळतां । मागील अनंता ठावें होतें ॥ ५ ॥ होतें तें द्यावया आला नारायण । मायबापा रीण गौळियांचें ॥ ६ ॥ गौळियांचें सुख दूर्लभ आणिकां । नाहीं ब्रह्मादिका तुका ह्मणे ॥ ७ ॥

॥ ६६८१ ॥ नेणतियांसाठीं नेणता लहान । थिंकोनी भोजन मागे माये ॥ १ ॥ माया दोनी यास बाप नारायणा । सारखी भावना तयांवरी ॥ २ ॥ तयांवरी साचा समचित्त भाव । देवकीवसुदेव नंद दोघे ॥ ३ ॥ घेऊनियां एके ठायीं अवतार । एकीं केला थोर वाढवूनी ॥ ४ ॥ उणा पुरा यासी नाहीं कोणी ठाव । सारिखाचि देव अवघियांसी ॥ ५ ॥ यांसी दोनी ठाव सारिखे अनंता । आधील मागुता वाढला तो ॥ ६ ॥ वाढला तो सेवा भक्तिचिया गुणें । उपचारमिष्टान्नें करूनियां ॥ ७ ॥ करूनी सायास मेळविलें धन तेंही कृष्णार्पण केलें तिहीं ॥ ८ ॥ कृष्णासी सकळ गाई घोडे ह्मैसी । समर्पिल्या दासीं जीवें भावें ॥ ९ ॥ जीवें भावें त्याची करितील सेवा न विसंवती नांवा क्षणभरी ॥ १० ॥ क्षणभरी होतां वेगळा तयांस । होती कासावीस प्राण त्यांचे ॥ ११ ॥ त्यांचे ध्यानीं मनीं सर्वभावें हरि । देह काम करी चित्त त्यापें ॥ १२ ॥ त्यांचेंचि चिंतन कृष्ण कोठें गेला । कृष्ण हा जेविला नाहीं कृष्ण ॥ १३ ॥ कृष्ण आला घरा कृष्ण गेला दारा । कृष्ण हा सोयिरा भेटों कृष्णा ॥ १४ ॥ कृष्ण गातां ओंव्या दळणीं कांडणीं । कृष्ण हा भोजनीं पाचारिती ॥ १५ ॥ कृष्ण तयां ध्यानीं आसनीं शयनीं । कृष्ण देखे स्वप्नीं कृष्णरूप ॥ १६ ॥ कृष्ण त्यांस दिसे अभास दुश्चितां । धन्य मातापिता तुका ह्मणे ॥ १७ ॥

॥ ६६८२ ॥ कृष्ण हा परिचारी कृष्ण हा वेव्हारी । कृष्ण घ्या वो नारी आणिकी ह्मणे ॥ १ ॥ ह्मणे कृष्णाविण कैसें तुह्मां गमे । विळ हा करमे गांयांविण ॥२॥ वांयांविण तुह्मी पिटितां चावटी । घ्या गे जगजेठी क्षणभरी ॥ ३ ॥ क्षणभरी याच्या मुखाचा सोहळा । पहा एकवेळा घेउनियां ॥ ४ ॥ याचें सुख तुह्मां कळलियावरी । मग दारोदारीं न फिराल ॥ ५ ॥ लटिकें हें तुह्मां वाटेल खेळणें । एका कृष्णाविणें अवघेंचि ॥ ६ ॥ अवघ्यांचा तुह्मी टाकाल सांगात । घेऊनी अनंत जाल राना ॥ ७ ॥ नावडे तुम्हांस आणीक बोलिलें । मग हें लागलें हरि ध्यान ॥ ८ ॥ न करा हा मग या जिवा वेगळा । टाकवाल बाळा आणिका ही ॥ ९ ॥ आणिका ही तुह्मां येती काकुलती । नवळी इच्छिती क्षण बैसों ॥ १० ॥ बैसों चला पाहों गोपाळाचें मुख । एकी एक सुख सांगतील ॥ ११ ॥ सांगे जंव ऐसी मात दसवंती । तंव त्या धरिती चित्तीं बाळा ॥ १२ ॥ बाळा एकी घरा घेऊनीयां जाती । नाहीं त्या परती तुका ह्मणे ॥ १३ ॥

॥ ६६८३ ॥ तुका ह्मणे पुन्हा न येती मागुत्या । कृष्णासीं खेळतां दिवस गमे ॥ १ ॥ दिवस राती कांहीं नाठवे तयांसी । पाहातां मुखासी कृष्णाचिया ॥ २ ॥ याच्या मुखें नये डोळ्यासी वीट । राहिले हे नीट तटस्थचि ॥ ३ ॥ ताटस्थ राहिलें सकळ शरीर । इंद्रियें व्यापार विसरलीं ॥ ४ ॥ विसरल्या तान भूक घर दार । नाहीं हा विचार असों कोठें ॥ ५ ॥ कोठें असों कोण झाला वेळ काळ । नाठवे सकळ विसरल्या ॥ ६ ॥ विसरल्या आह्मी कोणीये जातीच्या । वर्णाही चहूंच्या एक झाल्या ॥ ७ ॥ एक झाल्या तेव्हां कृष्णाचिया सुखें । निःशंक भातुकें खेळतील ॥ ८ ॥ खेळती भातुकें कृष्णाच्या सहित । नाहीं आशंकित चित्त त्यांचें ॥ ९ ॥ चित्तीं तो गोविंद लटिकें दळण । करिती हें जन करी तैसें ॥ १० ॥ जन करी तैसा खेळतील खेळ । अवघा गोपाळ करूनियां ॥ ११ ॥ करिती आपला अवघा गोविंद । जना साच फंद लटिका त्या ॥ १२ ॥ त्यांणीं केला हरि सासुरें माहेर । बंधु हे कुमर दीर भावे ॥ १३ ॥ भावना राहिली एकाचिये ठायीं । तुका ह्मणे पायीं गोविंदाचे ॥ १४ ॥

॥ ६६८४ ॥ गोविंद भ्रतार गोविंद मुळहारी । नामें भेद परि एकाचि तो ॥ १ ॥ एकाचीच नामें ठेवियेलीं दोनी । कल्पितील मनीं यावें जावें ॥ २ ॥ जावें यावें तिहीं घरींचिया घरीं । तेथींची सिदोरी तेथें न्यावी ॥ ३ ॥

विचारितां दिसे येणें जाणें खोटें । दाविती गोमटें लोका ऐसें ॥ ४ ॥ लोक करूनियां साच वर्तताती । तैशा या खेळती लटिक्याची ॥ ५ ॥ लटिकी क-रिती मंगळदायकें । लटिकींच एकें एकां व्याही ॥ ६ ॥ व्याही भाई हरि सोयरा जांवयी । अववियांच्या ठायीं केला एक ॥ ७ ॥ एकासीच पावे जें कांहीं करिती । उपचार संपत्ति नाना भोग ॥ ८ ॥ भोग देती सर्व एका नारायणा । लटिक्या भावना व्याही भाई ॥ ९ ॥ लटिकाच त्यांणीं केला संवसार । जाणती साचार वेगळा त्या ॥ १० ॥ त्यांणीं मृत्तिकेचें करूनी अवघें । खेळतील दोघें पुरुषनारी ॥ ११ ॥ पुरुषनारी त्यांणीं ठेवियेलीं नांवें । कवतुकभावें विचरती ॥ १२ ॥ विचरती जैसे साच भावें लोक । तैसें नाहीं सुख खेळतीया ॥ १३ ॥ यांणीं जाणितलें आपआपणया । लटिकें हें वांयां खेळतों तें ॥ १४ ॥ खेळतों ते आह्मी नव्हों नारीनर । ह्मणोनी विकार नाहीं तयां ॥ १५ ॥ तयां ठावें आहे आह्मी अवघीं एक । म्हणोनी निःशंक खेळतील ॥ १६ ॥ तयां ठावें नाहीं हरीचिया गुणें । आह्मी कोण कोणें काय खेळों ॥ १७ ॥ काय खातों आह्मी कासया सांगातें । कैसें हें लागतें नेणों मुखीं ॥ १८ ॥ मुखीं चवी नाहीं वरी अंगीं लाज । वर्ण याती काज न धरिती ॥ १९ ॥ न धरिती कांहीं संकोच त्या मना । हांसतां या जना नाइकती ॥ २० ॥ नाइकती बोल आणिकांचे कानीं । हरि चित्तीं मनीं बैसलासे ॥ २१ ॥ बैसलासे हरि जयांचिये चित्तीं । तयां नावडती मायबापें ॥ २२ ॥ मायबापें त्यांचीं नेतीं पाचारूनी । बळें परि मनीं हरि वसे ॥ २३ ॥ वसतील बाळा आपलाले घरीं । ध्यान त्या अंतरीं गोविंदाचें ॥ २४ ॥ गोविंदाचें ध्यान निजलिया जाग्या । आणीक वाउग्या न बोलती ॥ २५ ॥ न बोलती निजलिया हरिविण । जागृति सपन एक झालें ॥ २६ ॥ एकविध सुख घेती नित्य बाळा । भ्रमर परिमळालागीं तैसा ॥ २७ ॥ तैसा त्यांचा भाव घेतला त्यांपरी । तुका ह्मणे हरि बाळलीला ॥ २८ ॥

॥ ६६८५ ॥ लीलाविग्रही तो लेववी खावबी । यशोदा बैसवी मांडीवरी ॥ १ ॥ मांडीवरी भार पुष्पाचिये परी । बैसोनियां करी स्तनपान ॥ २ ॥ नभाचाही साक्षी पाताळापरता । कुर्वाळिते माता हातें त्यासी ॥ ३ ॥ हातें कुर्वाळुनी मुखीं घाली घांस । पुरे ह्मणे तीस पोट धालें ॥ ४ ॥ पोट धालें मग देतसे ढेंकर । भक्तीचें तें फार तुळसीदळ ॥ ५ ॥ तुळसीदळ भावें सहित देवा पाणी । फार तें त्याहुनि क्षीरसागरा ॥ ६ ॥ क्षीराचा

कांटाला असे एकवेळ । भक्तींचें तें जळ गोड देवा ॥ ७ ॥ देवा भक्त जि-वाहुनी आवडती । सकळहि प्रीति त्यांच्याठायीं ॥ ८ ॥ त्यांचा हा अंकित सर्व भावें हरि । तुका ह्मणे करी सर्व काज ॥ ९ ॥

॥ ६६८६ ॥ जयेवेळीं चोरूनियां नेलीं वत्सें । तयालागीं तैसें होणें लागे ॥ १ ॥ लागे दोहीं ठायीं करावें पाळण । जगाचा जीवन मायबाप ॥ २ ॥ माय झाल्यावरी अवघ्या वत्सांची । घरीं वत्सें जीचीं तैसा झाला ॥ ३ ॥ झाला तैसा जैसे घरींचे गोपाळ । आणिक सकळ मोहरी पांवे ॥ ४ ॥ मोहरी पावे सिंगे वाहिल्या काहाळा । देखिला सोहाळा ब्रह्मादिकीं ॥ ५ ॥ ब्रह्मा-दिकां सुख स्वप्नींही नाहीं । तेंसें दोहीं ठायीं वोसंडलें ॥ ६ ॥ वोसंडल्या क्षीर अमुप त्या गायी । जैसी ज्याचीं आई तैसा झाला ॥ ७ ॥ लाघव कळलें ब्रह्मयासी याचें । परब्रह्म साचें अवतरलें ॥ ८ ॥ तरले हे जन सक-ळही आतां । ऐसें तो विधाता बोलियेला ॥ ९ ॥ लागला हे स्तुति करूं अनंताचि । चतुर्मुख वाची भक्ति स्तोत्रें ॥ १० ॥ भक्तिकाजें देवें केला अव-तार । पृथ्वीचा भार फेडावया ॥ ११ ॥ पृथिवी दाटिली होती या असुरीं । नासाहावे वरी भार तये ॥ १२ ॥ तया काकुलती आपल्या दासांची । तया लागीं वेची सर्वस्वही ॥ १३ ॥ स्वहित दासांचें करावयालागीं । अव्यक्त हें जगीं व्यक्ती आलें ॥ १४ ॥ लेखा कोण करी त्यांचिया पुण्याचा । जयां-सवें वाचा बोले हरी ॥ १५ ॥ हरी नाममात्रें पातकांच्या रासी । तो आला घरासी गौळियांच्या ॥ १६ ॥ गौळियें अवघीं झालीं कृष्णमय । नामें लो-कत्रय तरतील ॥ १७ ॥ तरतील नामें कृष्णाचिया दोषी । बहुत ज्यांपाशीं होईल पाप ॥ १८ ॥ पाप ऐसें नाहीं कृष्णनामें राहे । धन्य तोचि पाहे कृष्णमुख ॥ १९ ॥ मुख माझें काय जो मी वर्णू पार । मग नमस्कार घाली ब्रम्हा ॥ २० ॥ ब्रह्मा नमस्कार घाली गोधनासी । कळला तयासी हाचि देव ॥ २१ ॥ देवाचि अवघा झालासे सकळ । गाई हा गोपाळ वत्सें तेथें ॥ २२ ॥ तेथें पाहाणें जें आणिक दुसरें । मूर्ख त्या अंतरें दुजा नाहीं ॥ २३ ॥ दुजा भाव तुका ह्मणे जया चित्तीं । रवरव भोगिती कुंभपाक ॥ २४ ॥

॥ ६६८७ ॥ कुंभपाक लागे तयासी भोगणें । अवघाचि नेणे देव ऐसा ॥ १ ॥ देव ऐसा ठावा नाहीं जया जना । तयासी यातना यम करी ॥ २ ॥ कळला हा देव तया साच खरा । गाई वत्सें घरा धाडी ब्रह्मा ॥ ३ ॥ ब्रह्मादिकां ऐसा देव अगोचर । कैसा त्याचा पार जाणवेल ॥ ४ ॥ जाण-वेल देव गौळियांच्या भावें । तुका ह्मणे व्हावें संचित हें ॥ ५ ॥

॥ ६६८८ ॥ संचित उत्तम भूमि कसूनियां । जाऊं नेणें वांयां परि सावें ॥ १ ॥ त्याचिया पिकासी आलिया घुमरी । आल्या गाईवरी आणिक गाई ॥ २ ॥ गाई दवडुनि घालिती बाहेरी । तंव ह्मणे हरी बांधा त्याही ॥ ३ ॥ त्याही तुह्मी बांधा तुमच्या सारिख्या । भोवंडा पारिख्या वाड्यांतुनी ॥ ४ ॥ पारिख्या न येती कोणाचिया घरा । सूत्रधारी खरा नारायण ॥ ५ ॥ नारायण नांदे जयाचिये ठायीं । सहज तेथें नाहीं घालमेली ॥ ६ ॥ मेलीं हीं शाहाणीं करितां सायास । नाहीं सुखलेश तुका ह्मणे ॥ ७ ॥

॥ ६६८९ ॥ तुका ह्मणे सुख घेतलें गोपाळीं । नाचती कांबळी करुनी ध्वजा ॥ १ ॥ करूनियां टिरी आपुल्या मांदळ । वाजविती टाळ दगडाचे ॥ २ ॥ दगडाचे टाळ कोण त्यांचा नाद । गीत गातां छंद ताल नाहीं ॥ ३ ॥ ताल नाहीं गातां नाचतां गोपाळां । घननीळ सांवळा तयांमध्यें ॥ ४ ॥ मध्यें जयां हरि तें सुख आगळें । देहभाव काळें नाहीं तयां ॥ ५ ॥ तयांसी आळंगी आपुलिया करीं । जाती भूमीवरी लोटांगणीं ॥ ६ ॥ निजभाव देखे जयांचिये अंगीं । तुका ह्मणे संगीं क्रीडे तयां ॥ ७ ॥

॥ ६६९० ॥ तयांसवें करी काला दहींभात । सिदोऱ्या अनंत मेळवुनी ॥ १ ॥ मेळवुनी अवघियांचे एके ठायीं । मागें पुढें कांहीं उरों नेदी ॥ २ ॥ नेदी चोरी करूं जाणें अंतरींचें । आपलें ही साचें द्यावें तेथें ॥ ३ ॥ द्यावा दहीं भात आपले प्रकार । तयांचा वेव्हार सांडवावा ॥ ४ ॥ वांटी सकळांसी हातें आपुलिया । जैसें मागें तया तैसें द्यावें ॥ ५ ॥ द्यावें सांभाळुनी सम तुकभावें । आपणही खावें सांचें तुक ॥ ६ ॥ तुक सकळांचें गोविंदाचे हातीं । कोण कोणें गति भला बुरा ॥ ७ ॥ राखे त्यासी तैसें आपलाल्या भावें । विचारूनी द्यावें जैसें तैसें ॥ ८ ॥ तैसें सुख नाहीं वैकुंठींच्या लोका । तें दिलें भाविकां गोपाळांसी ॥ ९ ॥ गोपाळांचे मुखीं देऊनी कवळ । घांस माखे लाळ खाय त्यांची ॥ १० ॥ त्यांचिये मुखींचे काढूनियां घांस । झोंबता हातांस खाय बळें ॥ ११ ॥ बळें जयाचिया ठेंगणें सकळ । तया ते गोपाळ पाडितील ॥ १२ ॥ पाठी उचलुनी वाहातील खांदीं । नाचतील मांदीं मेळवूनि ॥ १३ ॥ मांदीं मेळवूनी धणी दिली आज्ञा । तुका ह्मणे जमा केल्या गाई ॥ १४ ॥

॥ ६६९१ ॥ केला पुढें हरि अस्तमाना दिसा । मागें त्यासरिसा थाट चाले ॥ १ ॥ थाट चाले गाई गोपाळांची धूम । पुढें कृष्ण राम तयां सो-

यी ॥ २ ॥ सोयी लागलीया तयांची अनंतीं । न बोलावितां येती मागें तया ॥ ३ ॥ तयांचिये चित्तीं बैसला अनंत । घेती नित्यनित्य तेंचि सुख ॥ ४ ॥ सुख नाहीं कोणा हरीच्या वियोगें । तुका म्हणे जुगें घडी जाय ॥ ५ ॥

॥ ६६९२ ॥ जाय फाकोनियां निवडोनी गाई । आपुल्याच सोयी घराचिये ॥ १ ॥ घराचिये सोयी अंतरला देव । गोपाळांचे जीव गोविंदापें ॥ २ ॥ गोविंदें वेधीलें तुका ह्मणे मन । वियोगें ही ध्यान संयोगाचें ॥ ३ ॥

॥ ६६९३ ॥ संयोग सकळां असे सर्वकाळ । दुश्चित्त गोपाळ आला दिसे ॥ १ ॥ गोपाळ गुणाचा ह्मणे गुणमय । निंबलोण माये उतरिलें ॥ २ ॥ उतरूनी हातें धरी हनुवटी । ओवाळुनी दिठी सांडियेली ॥ ३ ॥ दिठी घाली माता विश्वाच्या जनका । भक्तीचिया सुखा गोडावला ॥ ४ ॥ लहान हा थोर जीवजंतु भुतें । आपण दैवतें झाला देवी ॥ ५ ॥ देवी ह्मैसासुर मुंजिया खेचर । लहानहि थोर देव हरि ॥ ६ ॥ हरि तुका म्हणे अवघा एकला । परि हा धाकुला भक्तीसाटीं ॥ ७ ॥

॥ ६६९४ ॥ भक्तीसाठीं केली यशोदेसी आळी । थिंकोनियां चोळी डोळे देव ॥ १ ॥ देव गिळूनियां धरिलें मोहन । माय ह्मणे कोण येथें दुजें ॥ २ ॥ दुजें येथें कोणी नाहीं कृष्णाविण । निरुतें जाणोन पुसे देवा ॥ ३ ॥ देवापाशीं पुसे देव काय झाला । हांसें आलें बोला याचें हरि ॥ ४ ॥ यांचे मी जवळी देव तो नेणती । लटिकें मानिती साच खरें ॥ ५ ॥ लटिकें तें साच साच तें लटिकें । नेणती लोभिकें आशाबद्ध ॥ ६ ॥ सांग ह्मणे माय येरू वासी तोंड । तव तें ब्रह्मांड देखे माजी ॥ ७ ॥ माजी जया चंद्र सूर्य तारां-गणें । तो भक्तांकारणें बाळलीळा ॥ ८ ॥ लीळा कोण जाणे याचें महिमान । जगाचें जीवन देवादिदेव ॥ ९ ॥ देवें कवतुक दाखविलें तयां । लागती ते पायां मायबाप ॥ १७ ॥ मायबाप ह्मणे हाचि देव खरा । आणिक पसारा लटिका तो ॥ ११ ॥ तोहि त्यांचा देव दिला नारायणें । माझें हें करणें तोहि मीच ॥ १२ ॥ मीच ह्मणउनी जें जें जेथें ध्याती । तेथें मी श्रीपति भोगिता तें ॥ १३ ॥ तें मज वेगळें मी तया निराळा । नाहीं या सकळा ब्रह्मांडांत ॥ १४ ॥ तद्भावना तैसें भविष्य तयाचें । फळ देता साचें मीच एक ॥ १५ ॥ मीच एक खरा बोले नारायण । दाविलें निर्वाण निजदासां ॥ १६ ॥ निजदासां खूण दाविली निरुती । तुका ह्मणे भूतीं नारायण ॥ १७ ॥

॥ ६६९५ ॥ नारायण भूतीं न कळे जयांसी । तयां गर्भवासीं येणें जाणें ॥ १ ॥ येणें जाणें होय भूतांच्या मत्सरें । न कळतां खरें देव ऐसा ॥ २ ॥ देव ऐसा जया कळला सकळ । गेली तळमळ द्वेषबुद्धि ॥ ३ ॥ बुद्धीचा पालट नव्हे कोणे काळीं । हरि जळीं स्थळीं तयां चित्तीं ॥ ४ ॥ चित्त तें निर्मळ जैसें नवनीत । जाणिजे अनंत तयामाजी ॥ ५ ॥ तयामाजी हरि जाणिजे त्या भावें । आपलें परावें सारिखेंचि ॥ ६ ॥ चिंतनें तयांच्या तरती आणीक । जो हें सकळीक देव देखे ॥ ७ ॥ देव देखे तोही देव कसा नव्हे । उरला संदेहें काय त्यासी ॥ ८ ॥ काया वाचा मनें पुजावे वैष्णव । ह्मणउनी भाव धरूनियां ॥ ९ ॥ यांसीं कवतुक दाखविलें रानीं । वोणवा गिळूनी गोपाळांसी ॥ १० ॥ गोपाळांसी डोळे झांकविले हातें । धरिलें अनंतें विश्वरूप ॥ ११ ॥ पसरूनी मुख गिळियेलें ज्वाळ । पहाती गोपाळ बोटां सांदी ॥ १२ ॥ संधि सारूनियां पाहिलें अनंता । ह्मणती ते आतां कळलासी ॥ १३ ॥ कळला हा तुझा देह नव्हे देवा । गिळिला वोणवा आणीक तो ॥ १४ ॥ तो तयां कळला आरुषां गोपाळां । दुर्गम सकळां साधनांसी ॥ १५ ॥ सीण उरे तुका ह्मणे साधनाचा । भाविकांसी साचा भाव दावी ॥ १६ ॥

॥ ६६९६ ॥ भाव दावी शुद्ध देखोनियां चित्त । आपल्या अंकित निजदासां ॥ १ ॥ सांगे गोपाळांसी काय पुण्य होतें । वाचलों जळते आगी हातीं ॥ २ ॥ आजी आह्मां येथें राखियेलें देवें । नाहीं तरी जीवें न वांचतों ॥ ३ ॥ न वांचत्या गाई जळतों सकळें । पूर्वपुण्यबळें वांचविलें ॥ ४ ॥ पूर्वपुण्य होतें तुमचिये गांठीं । बोले जगजेठी गोपाळांसी ॥ ५ ॥ गोपाळांसी ह्मणे वैकुंठनायक । भले तुह्मी एक पुण्यवंत ॥ ६ ॥ करी तुका ह्मणे करविता आपण । द्यावें थोरपण सेवकांसी ॥ ७ ॥

॥ ६६९७ ॥ काय आह्मां चालविसी वायांविण । ह्मणती दुरून देखिलासी ॥ १ ॥ लावूनियां डोळे नव्हतों दुश्चित । तुज परचित्त भाव होती ॥ २ ॥ होती दृष्टि आंत उघडी आमची । बाहेरी ते वांयांचि कुंची झाकूं ॥ ३ ॥ झालासी थोरला थोरल्या तोंडाचा । गिळियेला वाचा धुर आगी ॥ ४ ॥ आगी खातो ऐसा आमचा सांगाती । आनंदें नाचती भोंवताली ॥ ५ ॥ भोंवतीं आपणा मेळविलीं देवें । तुका ह्मणे ठावें नाहीं ज्ञान ॥ ६ ॥

॥ ६६९८ ॥ नाहीं त्याची शंका वैकुंठनायका । नेणती ते एकाविण दुजा ॥ १ ॥ जाणतियां सर्वे येऊं नेदी हरि । तर्कवादी दुरी दुराविले ॥ २ ॥

ादियासी भेद निंदा अहंकार । देऊनियां दूर दुराविले ॥ ३ ॥ दुराविले
र आशाबद्ध देवा । करितां या सेवा कुटुंबाची ॥ ४ ॥ चित्तीं द्रव्यदारा
त्रादि संपत्ति । समान ते होती पशु नर ॥ ५ ॥ नरक साधिला विसरोनीं
वा । बुडाले ते भवनदीमाजी ॥ ६ ॥ जिहीं हरिसंग केला संवसारीं ।
तुका ह्मणे खरी खेप त्यांची ॥ ७ ॥

॥ ६६९९ ॥ खेळींमेळीं आले घरा गोपीनाथ । गोपाळांसहित मातेपा-
शीं ॥ १ ॥ मातेपाशीं एक नवल सांगती । झाली तैसी ख्याती वोणव्याची
॥ २ ॥ ओवाळिलें तिनें करूनी आरती । पुसे दमवंती गोपाळांसी ॥ ३ ॥
पुसे पडताळुनी मागुती मागुनी । गोपाळ सांगती कवतुक ॥ ४ ॥ कवतु-
क कानीं आइकतां त्याचे । बोलतां ये वाचे नीट नये ॥ ५ ॥ नयन गुं-
तले श्रीमुख पाहतां । न साहे लवतां आड पातें ॥ ६ ॥ तेव्हां कवतुक कळों
आलें कांहीं । हळूहळू दोहीं मायबापां ॥ ७ ॥ हळूहळू त्यांचें पुण्य झालें
वाड । वारलें हें झाड तिमिराचें ॥ ८ ॥ तिमिर हें तेथें राहों शके कैसें ।
झालिया प्रकाशें गोविंदाच्या ॥ ९ ॥ दावी तुका ह्मणे देव ज्या आपणा ।
पालटे तें क्षणामाजी एका ॥ १० ॥

॥ ६७०० ॥ काय आतां यासी ह्मणावें लेंकरू । जगाचा हा गुरु
मायबाप ॥ १ ॥ माया याची यासी राहिली व्यापून । कळों नये क्षण एक
होतां ॥ २ ॥ क्षण एक होतां विसरलीं त्यासी । माझें माझें ऐसें करी
बाळा ॥ ३ ॥ करी कवतुक कळों नेदी कोणा । योजूनी कारणा तेंचि खेळे
॥ ४ ॥ तें सुख लुटिलें घरींचिया घरीं । तुका ह्मणे परी आपुलाल्या ॥ ५ ॥

॥ ६७०१ ॥ आपुलाल्यापरी करितील सेवा । गीत गाती देवा खेळवूनी
॥ १ ॥ खेळ मांडियेला यमुने पावळीं । या रे चेंडूफळी खेळूं आतां ॥ २ ॥
आणविल्या डांगा चवगुणा काठी । बैसोनियां वांटी गडिया गडी ॥ ३ ॥
गडी जंव पाहे आपणासमान । नाहीं नारायण ह्मणे दुजा ॥ ४ ॥ जाणोनि
गोविंदें सकळांचा भाव । तयांसी उपाव तोचि सांगे ॥ ५ ॥ सांगे सकळां-
सी व्हां रे एकीकडे । चेंडू राखा गडे तुह्मी माझा ॥ ६ ॥ मज हा नलगे
आणीक सांगातीं । राखावी वहुतीं हाक माझी ॥ ७ ॥ माझे हाके हाक
मेळवा सकळ । नव जा बरळ एकमेका ॥ ८ ॥ एका समतुके अवघेचि
राहा । जाईल तो पाहा धरा चेंडू ॥ ९ ॥ चेंडू धरा ऐसें सांगतों सकाळां ।
आपण निराळा एकलाचि ॥ १० ॥ चिंतुनियां चेंडू हाणे ऊर्ध्वमुखें ।

ठेलीं सकळीक पाहाताचि ॥ ११ ॥ पाहाताचि ठेलीं न चलतां कांहीं । येरू लवलाहीं ह्मणे धरा ॥ १२ ॥ धरावा तयानें साचें बळ ज्यासी । येरां आणिकांसी लाग नव्हे ॥ १३ ॥ नव्हे काम बळ बुद्धि नाहीं त्याचें । न धरवे निचे उंचाविण ॥ १४ ॥ विचारीं पडिले देखोनी गोपाळ । या ह्मणे सकळ मजमागें ॥ १५ ॥ मार्ग देवाविण न दिसे आणिका । चतुर होत का बहुत जन ॥ १६ ॥ चतुर चिंतिती बहुत मारग । हरि जाय लाग पाहोनियां ॥ १७ ॥ यामागें जे गेले गोविंदा गोपाळ । ते नेले सीतळ पंथ ठायां ॥ ॥ १८ ॥ पंथ जे चुकले आपले मतीचे । तयामागें सांचे तेचि हाल ॥ १९ ॥ हाल दोघां एक मोहरा मागिलां । चालतां चुकला वाट पंथ ॥ २० ॥ पंथ पुढिलांसी चालतां न कळे । मागिलांनीं डोळे उघडावे ॥ २१ ॥ वयाचा प्रबोध विचार ज्या नाहीं । समान तो देहीं बाळकांसी ॥२२॥ सिकविलें हित नाइके जो कानीं । त्यामागें भल्यांनीं जाऊं नये ॥ २३ ॥ नये तेंचि करी श्रेष्ठाचिया मना । मूर्ख एक जाणा तोचि खरा ॥ २४ ॥ रानभरी झाले न कळे मारग । मग तो श्रीरंग आठविला ॥ २५ ॥ लाज सांडूनियां मारितील हाका । कळलें नायका वैकुंठींच्या ॥ २६ ॥ चारी वेद ज्याची कीर्ति वाखाणिती । तया अति प्रीति गोपाळांची ॥ २७ ॥ गोपाळांचा धांवा आइकिला कानीं । सोयी चक्रपाणि पालविलें ॥ २८ ॥ सोयी धरुनियां आले हरिपासीं । लहान थोरांसी सांभाळिलें ॥ २९ ॥ सांभाळिलें तुका ह्मणे सकळांहि । सुखी झाले तेही हरिमुखें ॥ ३० ॥

॥ ६७०२ ॥ मुखें सांगे त्यांसी पैल चेंडू पाहा । उदकांत डोहाचिये माथां ॥ १ ॥ माथां कळंबाचे अवघडा ठायीं । दावियेला डोहीं जळामाजी ॥ २ ॥ जळांत पाहातां हाडति या दृष्टि । ह्मणे जगजेठी ऐसें नव्हे ॥ ३ ॥ नव्हे साच चेंडू छाया दिसे आंत । खरा तेथें चित्त लावा वरी ॥ ४ ॥ वरी देखियेला अवघ्यांनीं डोळां । ह्मणती गोपाळा आतां कैसें ॥ ५ ॥ कैसें करूनियां उतरावा खालीं । देखोनियां भ्यालीं अवघीं डोहो ॥ ६ ॥ डोहो बहु खोल काळ्या भीतर । सरलीं माघारीं अवघीं जणें ॥ ७ ॥ जयाचें कारण तयासीच ठावें । पुसे साच्या भावें त्यास हरि ॥ ८ ॥ त्यासी नारायण ह्मणे रहा तळीं । चढे वनमाळी झाडावरी ॥ ९ ॥ वरी जातां हरि पाहाती गोपाळ । ह्मणती सकळ आह्मी नेणों ॥ १० ॥ नेणों ह्मणती हें करितोसी कायी । आह्मां तुझी आई देईल सिव्या ॥११॥ आपुलिया कानां

ठेवूनियां हात । सकळीं निमिस टाळियेलें ॥ १२ ॥ निमिसाकारणें रचिलें कारण । गेला नारायण खांदीवरी ॥ १३ ॥ खांदीवरी पाव ठेवियेला देवें । पाडावा सा भावें चेंडु तळीं ॥ १४ ॥ तळील नेणती तुका ह्मणे भाव । अंतरींचा देव जाणों नेदी ॥ १५ ॥

॥ ६७०३ ॥ नेदी कळों केल्याविण तें कारण । दाखवी आणून अनुभवा ॥ १ ॥ न पुरेसा हात घाली चेंडुकडे । ह्मणीतलें गडे सांभाळावें ॥ २ ॥ सांभाळ करिता सकळां जीवांचा । गोपाळांसी वाचा ह्मणे बरें ॥ ३ ॥ बरें विचारूनी करावें कारण । ह्मणे नारायण उऱ्या बरें ॥ ४ ॥ बरें म्हणऊनी तयांकडे पाहे । सोडविला जाय चेंडु तळा ॥ ५ ॥ तयासवें उडी घातली अनंतें । गोपाळ रडत येती घरा ॥ ६ ॥ येतां त्यांचा लोकीं देखिला कोल्हाळ । सामोरीं सकळ आलीं पुढें ॥ ७ ॥ पुसती ते मात आपआपल्यासी । हरिदुःखें त्यांसी न बोलवे ॥ ८ ॥ न बोलवे हरि बुडालासे मुखें । कुटितील दुःखें उर माथे ॥ ९ ॥ मायबापें तुका म्हणे न देखती । ऐसें दुःख चित्तीं गोपाळांच्या ॥ १० ॥

॥ ६७०४ ॥ गोपाळां उभडु नावरे दुःखाचा । कुंठित हे वाचा झाली यांची ॥ १ ॥ झालें काय ऐसें न कळे कोणासी । ह्मणती तुह्मांपासीं देव होता ॥ २ ॥ देवासवें दुःख न पवते ऐसें । कांहीं अनारिसें दिसे आजी ॥ ३ ॥ आजी दिसे हरि फांकला यांपाशीं । ह्मणऊनी ऐशी परी झाली ॥ ४ ॥ जाणविल्याविण कैसें कळे त्यांसी । शहाणे तयांसी कळों आलें ॥ ५ ॥ कळों आलें तिहीं फुंद शांत केला । ठायींचाच त्यांला थोडा होता ॥ ६ ॥ होता तो विचार सांगितला जना । गोपाळ शाहाणा होता त्याणें ॥ ७ ॥ सांगे आतां हरि तुह्मां आम्हां नाहीं । बुडाला तो डोहीं यमुनेच्या ॥ ८ ॥ यासी अवकाश नव्हेचि पुसतां । झालिया अनंता कोण परी ॥ ९ ॥ परी त्या दुःखाची काय सांगों आतां । तुका ह्मणे माता लोकपाळा ॥ १० ॥

॥ ६७०५ ॥ पाषाण फुटती तें दुःख देखोनी । करितां गौळणी शोक लोकां ॥ १ ॥ काय ऐसें पाप होतें आम्हांपासीं । बोलती एकासी एक एका ॥ २ ॥ एकांचिये डोळां असु बाह्यात्कारीं । नाहीं तीं अंतरीं जळतील ॥ ३ ॥ जळतील एकें अंतर्बाह्यात्कारें । टाकिलीं लेंकुरें कडियेहूनी ॥ ४ ॥ निवांतचि एकें राहिलीं निश्चित । बाहेरी ना आंत जीव त्यांचे ॥ ५ ॥ त्यांचे जीव वरी आले त्या सकळां । एका सा गोपाळांवांचुनियां ॥ ६ ॥ वांचणें तें

आतां खोटें संवसारीं । नव्हे भेटी जरी हरीसवें ॥ ७ ॥ सर्वे घेऊनियां चाल-
लीं गोपाळां । अवघींच बाळा नर नारी ॥ ८ ॥ नर नारी नाहीं मनुष्याचें
नांव । गोकुळ हें गांव सांडियेलें ॥ ९ ॥ सांडियेलीं अन्नें संपदा सकळ । चित्तीं
तो गोपाळ धरुनी जाती ॥ १० ॥ तिरीं माना घालूनियां उभ्या गाई । तटस्थ
या डोहीं यमुनेच्या ॥ ११ ॥ यमुनेच्या तिरीं झाडें वृक्ष वल्ली । दुःखें
कोमाइलीं कृष्णाचिया ॥ १२ ॥ यांचें सांचें दुःख एक झालें तिरीं । मग
शोक करी मायबाप ॥ १३ ॥ मायबाप तुका ह्मणे सहोदर । तोंवरीच तीर
न पवतां ॥ १४ ॥

॥ ६७०६ ॥ तीर देखोनियां यमुनेचें जळ । काठींच कोल्हाळ करि-
ताती ॥ १ ॥ कइवाड नव्हे घालावया उडी । आपणासी ओढी भय मागें
॥ २ ॥ मागें सरे माय पाउलापाउलीं । आपलेंच घाली धाकें अंग ॥ ३ ॥
अंग राखोनियां माय खेद करी । अंतरींचें हरी जाणवलें ॥ ४ ॥ जाणवलें
मग देवें दिली बुडी । तुका ह्मणे कुडी भावना हे ॥ ५ ॥

॥ ६७०७ ॥ भावनेच्या मुळें अंतरला देव । शिरला संदेह भयें पोटीं
॥ १ ॥ पोटीं होतें मागें जीव द्यावा ऐसें । बोलिल्या सरिसें न करवे ॥ २ ॥
न करवे त्याग जीवाचा या नास । नारायण त्यास अंतरला ॥ ३ ॥ अंतरला
वहु बोलतां वाउगे । अंतरींच्या त्यागेंविण गोष्टी ॥ ४ ॥ गोष्टी सकळांच्या
आइकिल्या देवें । कोण कोण्याभावें रडतीं तीं ॥ ५ ॥ तीं गेलीं घरास आ-
पल्या सकळ । गोधनें गोपाळ लोक माय ॥ ६ ॥ मायाबापांची तों ऐसी
झाली गति । तुका ह्मणे अंतीं कळों आलें ॥ ७ ॥

॥ ६७०८ ॥ आला सांचा भाव देवाचिया मना । अंतरीं कारणासा-
ठीं होता ॥ १ ॥ होता भाव त्यांचा पाहोनी निराळा । नव्हता पाताळा
गेला आधीं ॥ २ ॥ आधीं पाठीमोरीं झालीं ती सकळें । मग या गोपाळें
बुडी दिली ॥ ३ ॥ दिली हाक त्याणें जाऊनी पाताळा । जागविलें काळा
भुजंगासी ॥ ४ ॥ भुजंग हा होता निजला मंदिरीं । निर्भर अंतरीं गर्वनि-
धि ॥ ५ ॥ गर्व हरावया आला नारायण । मिस या करून चेंडुवाचें ॥ ६ ॥
चेंडुवाचे मिसें काळया नाथावा । तुका म्हणे देवा कारण हें ॥ ७ ॥

॥ ६७०९ ॥ काळयाचे मागे चेंडू पत्नीपाशीं । तेजःपुंज राशी देखि-
येला ॥ १ ॥ लावण्यपुतळा मुखप्रभाराशी । कोटि रवि शशी उगवले
॥ २ ॥ उगवला खांब कर्दळीचा गाभा । ब्रीदें वांकी नभा देखे पायीं ॥ ३ ॥

[हि]हिला सकळ तिनें न्याहाळूनी । कोण या जननी विसरली ॥ ४ ॥ विस-
[रे] हा तीस कैसा याचा झाला । जीवाहूनी वाला दिसतसे ॥ ५ ॥ दिसतसे
[रू]प गोजिरें लहान । पाहतां लोचन सुखावले ॥ ६ ॥ पाहिलें पतोंनी का-
[ळ]ग दुष्टाकडे । मग ह्मणे कुडें झालें आतां ॥ ७ ॥ आतां हा उठोनी खाईल
[य]ा बाळा । देईल वेल्हाळा माय जीव ॥ ८ ॥ जीव याचा कैसा वांचे ह्मणे
[न]ारी । मोहिली अंतरीं हरीरूपें ॥ ९ ॥ रूपें अनंताचीं अनंतप्रकार । न कळे
[स]ाचार तुका ह्मणे ॥ १० ॥

॥ ६७१० ॥ ह्मणे चेंडू कोणें आणिला या ठाया । आलों पुरवाया
कोड त्याचें ॥ १ ॥ त्याचें आइकोन निष्ठुर वचन । भयाभीत मन झालें तिचें
॥ २ ॥ तिची चित्तवृत्ति होती देवावरी । आधीं ते माघारी फिरली वेगीं ॥ ३ ॥
वेगीं मन गेलें भ्रताराचे सोयी । विघ्न आलें कांहीं आह्मांवरी ॥ ४ ॥ वरी
उदकास अंत नाहीं पार । अक्षोभ सागर भरलासे ॥ ५ ॥ संचारकरूनी
कोण्या वाटे आला । ठायींच देखिला अवचिता ॥ ६ ॥ अवचिता नेणों येथें
उगवला । दिसे तो धाकुला बोल मोठे ॥ ७ ॥ मोठ्यानें बोलतो भय नाहीं
मनीं । केला उठवूनी काळ जागा ॥ ८ ॥ जागविला काळसर्प तये वेळीं ।
उठिला कल्लोळीं विषाचिये ॥ ९ ॥ यमुनेच्या डोहावरी आला ऊत ।
काळयाकृतांतधुधुकारें ॥ १० ॥ कारणें ज्या येथें आला नारायण । झालें
दरुषण दोघांमध्यें ॥ ११ ॥ दोघांमध्यें झाले बोल परस्परें । प्रसंग उत्तरें
युद्धाचिया ॥ १२ ॥ चिनावला चित्तीं तोंडें बोले काळ । करीन सकळ
ग्रास तुझा ॥ १३ ॥ झाला सावकाश झेंप घाली वरी । तंव ह्मणे हरि मुष्टि-
घातें ॥ १४ ॥ तेणें काळें स्वामी दिसे काळ तैसा । हरावया जैसा जीव
आला ॥ १५ ॥ आठवले काळा हाकारिलें गोत । मिळालीं बहुत नागकुळें
॥ १६ ॥ कल्हारीं संधानीं वेष्टियेला हरि । अवघा विखारीं व्यापियेला
॥ १७ ॥ यांस तुका ह्मणे नाहीं भक्ताविण । गरुडाचें चिंतन केलें
मनीं ॥ १८ ॥

॥ ६७११ ॥ निजदास उभा तात्काळ पायापें । स्वामी देखे सर्पें वेष्टि-
येला ॥ १ ॥ लहानथोरें होतीं मिळालीं अपारें । त्यांच्या धुधुकारें निवारलीं
॥ २ ॥ नियतां आपटी धरूनी धांवामधीं । एकाचेंचि वधी माथें पायें
॥ ३ ॥ एकीं जीव दिले येतांच त्या धाकें । येतील तीं एकें काकुलती ॥
॥ ४ ॥ यथेष्ट भक्षिलीं पोट धाये वरी । तंव ह्मणे हरि पुरे आतां ॥ ५ ॥

आतां करूं काम आलों जयासाठीं । हरि घाली मिठी काळयासी ॥ ६ ॥ यासी नाथुनियां नाकीं दिली दोरी । चेंडू भार शिरी कमळांचा ॥ ७ ॥ चालविला वरी बैसे नारायण । गरुडा आलंगून बहुडविलें ॥ ८ ॥ विसर न पडे संवगड्या गाई । यमुनेच्या डोहीं लक्ष त्यांचें ॥ ९ ॥ त्याच्या गोष्टी काठीं बैसोनी सांगती । बुडाला दाविती येथें हरि ॥ १० ॥ हरीचें चिंतन करितां आठव । तुका ह्मणे देव आला वरी ॥ ११ ॥

॥ ६७१२ ॥ अवचित त्यांणी देखिला भुजंग । पळतील मग हाउ आला ॥ १ ॥ आला घेऊनियां यमुने बाहेरी । पालवितो करीं गडियांसी ॥ २ ॥ गडियांसी ह्मणे वैकुंठनायक । या रे सकळीक मजपाशीं ॥ ३ ॥ मल्लपाशी तुह्मां भय काय करी । जवळी या दुरी जाऊं नका ॥ ४ ॥ कानीं आइकिले गोविंदाचे बोल । म्हणती नवल चला पाहों ॥ ५ ॥ पाहों आले हरी जवळ सकळ । गोविंदें गोपाळ आलिंगिले ॥ ६ ॥ आल्या गाई वरी घालितील माना । वोरसलें स्तना क्षीर लोटें ॥ ७ ॥ लोटती सकळें एकावरी एक । होऊनी पृथक कुर्वाळलीं ॥ ८ ॥ कुर्वाळलीं आनंदें घेती चारापाणी । तिहीं चक्रपाणी देखियेला ॥ ९ ॥ त्यांचपाशीं होता परि केली माव । न कळे संदेह पडलिया ॥ १० ॥ याति वृक्ष वल्ली होत्या कोमेलिया । सांसी कृष्णें कांया दिव्य दिली ॥ ११ ॥ दिलें गोविंदें त्या पदा नाहीं नाश । तुका म्हणे आस निरसली ॥ १२ ॥

॥ ६७१३ ॥ आस निरसली गोविंदाचे भेटी । संवसारा तुटी पुढिलिया ॥ १ ॥ पुढें पाठविलें गोविंदें गोपाळां । देऊनी चपळां हातीं गुढी ॥ २ ॥ हाका आरोळिया देऊनी नाचती । एक सादाविती हरि आला ॥ ३ ॥ आरंभीं पडिलीं होतीं तयां घरीं । संकीर्ण त्या नारी नरलोक ॥ ४ ॥ लोकां भूक तान नाहीं निद्रा डोळां । रूप वेळोवेळां आठविती ॥ ५ ॥ आहाकटा मग करिती गेलिया । आधीं ठावा तयां नाहीं कोणा ॥ ६ ॥ आधीं चुकी मग घडे आठवण । तुका म्हणे जन परिचयें ॥ ७ ॥

॥ ६७१४ ॥ जननी हे म्हणे आहा काय झालें । शरीर रक्षिलें काय काजें ॥ १ ॥ काय काज आतां हरिविण जिणें । नित्य दुःख कोणें सोसावें हें ॥ २ ॥ हें दुःख न सरे हरि न भेटे तों । त्यामागेंचि जातों एका वेळे ॥ ३ ॥ एकवेळ जरी देखतें मी आतां । तरी जीवांपरता न करितें ॥ ४ ॥ करितों हे मात हरीचें चिंतन । शुभ तो शकुन तुका म्हणे ॥ ५ ॥

॥ ६७१५ ॥ शुभ मात तिहीं आणिली गोपाळीं । चेंडू वनमाळी घेउनी आले ॥ १ ॥ आली दारा देखे हरुषाची गुढी । सांगितली पुढी हरुषें मात ॥ २ ॥ हरुषली माता केलें निंबलोण । गोपाळांवरून कुरवंडी ॥ ३ ॥ गोपाळां भोवतें मिळालें गोकुळ । अवघीं सकळ लहान थोरें ॥ ४ ॥ थोर सुख झालें ते काळीं आनंद । सांगती गोविंद वरी आला ॥ ५ ॥ आले वरी बैसोनियां नारायण । काळया नाथून वहन केलें ॥ ६ ॥ नगराबाहेरी निघाले आनंदें । लावूनियां वाद्यें नाना घोष ॥ ७ ॥ नारायणापुढें गोपाळ चालती आनंदें नाचती गाती गीत ॥ ८ ॥ तंव तो देखिला वैकुंठींचा पति । लोटांगणीं जाती सकळही ॥ ९ ॥ सकळही एका भावें आलिंगिलें । अवघियां झाले अवघे हरि ॥ १० ॥ हरि आलिंगनें हरिरूपझालीं । आप विसरलीं आपणास ॥ ११ ॥ सकळांसी सुख एक दिलें देवें । मायबापभावें लोकपाळां ॥ १२ ॥ मायबाप देवा नाहीं लोकपाळ । सारिखीं सकळ तुका म्हणे ॥ १३ ॥

॥ ६७१६ ॥ नेणे वर्ण धर्म जीं आलीं सामोरीं । अवघींच हरी आलिंगिलीं ॥ १ ॥ हरि लोकपाळ आले नगरांत । सकळांसहित मायबाप ॥ २ ॥ पारणें तयांचें झालें एका वेळे । देखिलें सांवळें परब्रम्ह ॥ ३ ॥ ब्रम्हानंदें लोक सकळ नाचती । गुढिया उभविती घरोघरीं ॥ ४ ॥ घरोघरीं सुख आनंद सोहळा । सडे रंग माळा चौकदारीं ॥ ५ ॥ दारीं वृंदावनें तुळसीचीं वनें । राम कृष्ण गाणें नारायण ॥ ६ ॥ नारायण तिहीं पूजिला बहूतीं । नाना पुष्पयाती करूनियां ॥ ७ ॥ यांचें ऋण नाहीं फिटलें मागील । पुढें भांडवल जोडिती हीं ॥ ८ ॥ हीं नव्हतीं कधीं या देवा वेगळीं । केला वनमाळी सेवाऋणी ॥ ९ ॥ सेवाऋणें तुका म्हणे रूपधारी । भक्तांचा कैवारी नारायण ॥ १० ॥

॥ ६७१७ ॥ नारायण आले निज मंदिरासी । झाले या लोकांसी बहुडविते ॥ १ ॥ बहुडविले बहु केलें समाधान । विसरु तो क्षण नका माझा ॥ २ ॥ मात सांगितली सकळ वृत्तांत । केलें दंडवत सकळांनीं ॥ ३ ॥ सकळां भातुक वांटिल्या साखरा । आपलाल्या घरा लोक गेले ॥ ४ ॥ लोक गेले कामा गाईपें गोपाळ । वारलीं सकळ लोभापाठीं ॥ ५ ॥ लोभ दावूनियां आपला विसर । पाडितो कुमर धनआशा ॥ ६ ॥ आशेचे बांधले तुका म्हणे जन । काय नारायण ऐसा जाणें ॥ ७ ॥

॥ ६७१८ ॥ झाला कवतुक करिता रोकडें । आणिकही पुढें नाराय
॥ १ ॥ येऊनियां पुढें धरिला मारग । हरावया भाग इंद्रयाजीं ॥ २ ॥ इंद्र
दहीं दूध तूप नेतां लोणी । घेतलें हिरोनी वाटे सांचें ॥ ३ ॥ हिरोनी घेत
ल्या कावडी सकळा । म्हणति गोपाळा बरें नव्हें ॥ ४ ॥ नव्हे तेंचि क
न भे कळिकाळा । तुका म्हणे लीळा खेळे देव ॥ ५ ॥

॥ ६७१९ ॥ खेळ नव्हे बरा इंद्र कोपलिया । देव म्हणे तया भी
नका ॥ १ ॥ नका धरूं भय धाक कांहीं मनीं । बोले चक्रपाणि गौळियांसी
॥ २ ॥ गौळियांसी धीर नाहीं या वचनें । आशंकित मनें वेडावलीं ॥ ३ ॥
वेडावलीं त्यांस न कळतां भाव । देवाआदिदेव नोळखतां ॥ ४ ॥ नोळखतां
दुःखें वाहाती शरीरीं । तुका म्हणे वरी भारवाही ॥ ५ ॥

॥ ६७२० ॥ भारवाही नोळखती या अनंता । जवळी असतां अंगसंगें
॥ १ ॥ अंगसंगें तयां न कळे हा देव । कळोनी संदेह मागुताला ॥ २ ॥ मा-
गुती पडती चिंतेचिये डोहीं । जयाची हे नाहीं बुद्धि स्थिर ॥ ३ ॥ बुद्धि
स्थिर होऊं नेदी नारायण । आशाबद्ध जन लोभिकांची ॥ ४ ॥ लोभिकां
न साहे देवाचें करणें । तुका म्हणे तेणें दुःखी होती ॥ ५ ॥

॥ ६७२१ ॥ दुःखी होती लोभें करावें तें काई । उडतील गाई म्हैसीं
आतां ॥ १ ॥ आणीकही कांहीं होईल अरिष्ट । नाइके हा धीट सांगितलें
॥ २ ॥ सांगों चला याच्या मायबापांपाशीं । निघाले घरासी देवा रागें ॥ ३ ॥
रागें काला देतां न घेती कवळ । टोंकवी गोपाळ क्रोधियांसी ॥ ४ ॥ क्रोध
देवावरी धरियेला राग । तुका ह्मणे भाग न लभती ॥ ५ ॥

॥ ६७२२ ॥ भाग सा सुखाचे वांकड्या बोबड्यां । आपलिया गड्यां
भाविकांसी ॥ १ ॥ भारवाही गेले टाकूनी कावडी । नवनीतगोडी भावि-
कांसी ॥ २ ॥ काला करूनियां वांटिला सकळां । आनंदें गोपाळांमाजी खेळे
॥ ३ ॥ खेळेमेळे दहीं दुध तूप खाती । भय नाहीं चित्तीं कवणाचें ॥ ४ ॥
कवणाचें चाले तुका म्हणे बळ । जयासी गोपाळ साह्य झाला ॥ ५ ॥

॥ ६७२३ ॥ जाणवलें इंद्रा चरित्र सकळ । वांकुल्या गोपाळ दाविताती
॥ १ ॥ तातडिया मेघा आज्ञा करी राव । गोकुळीचा ठाव उरों नेदा ॥ २ ॥ नेदा-
विया गाई म्हसी वांचों लोक । पुरा सकळीक सिळाधारी ॥ ३ ॥ धाक
नाहीं माझा गौळियांच्या पोरां । सकळीक मारा म्हणे मेघां ॥ ४ ॥ म्हण-
विती देव आपणां तोंवरी । जंव नाहीं वरी कोपलों मी ॥ ५ ॥ मीपणें हा

व नकळेचि त्यांसी । अभिमानें रासी गर्वाचिया ॥ ६ ॥ अभिमानराशी जया-
नये ठायीं । तुका म्हणे तईं देव दुरी ॥ ७ ॥

॥ ६७२४ ॥ देव त्यां फावला भाविकां गोपाळां । नाहीं तेथें कळा
अभिमान ॥ १ ॥ नाडलीं आपल्या आपणाचि एकें । संदेहदायकें बहुफारें ॥ २ ॥
कारें चालविलीं नेदी कळों भाव । देवाआदिदेव विश्वंभर ॥ ३ ॥ विश्वासावां-
चूनी कळों नये खरा । अभक्तां आधिरा जैसा तैसा ॥ ४ ॥ जैसा भाव तैसा
जवळी सा दुरी । तुका ह्मणे हरि देतो घेतो ॥ ५ ॥

॥ ६७२५ ॥ तो या साचभावें न कळेचि इंद्रा । ह्मणउनी धारा घाली
सळा ॥ १ ॥ घाली धारा मेघ कडाडिला माथा । वरी अवचिता देखिये-
ला ॥ २ ॥ देखती पाऊस बोलला गोपाळ । भ्याले हे सकळ विचारिती
॥ ३ ॥ विचार पडला विसरले खेळ । अन्याय गोपाळ ह्मणती केला ॥ ४ ॥
लागलेंसे गोड न कळे ते काळीं । भेणें वनमाळी आठविती ॥ ५ ॥ आतां
काय कैसा करावा विचार । गोधनासी थार आपणिया ॥ ६ ॥ यांचिया
विचारें होणार तें कायी । तुका ह्मणे ठायीं वेडावलीं ॥ ७ ॥

॥ ६७२६ ॥ वेडावलीं काय करावें या काळीं । म्हणे वनमाळी गोपा-
ळांसी ॥ १ ॥ शिरीं धरूं गोवर्धन उचलूनी । ह्मणे तुम्ही कोणी भिऊं
नका ॥ २ ॥ नका सांडूं कोणी आपला आवांका । मारितां या हाका आरो
ळिया ॥ ३ ॥ आशंकित चित्तें न वाटे यां खरें । धाकेंच ते वरें ह्मणती चला
॥ ४ ॥ चित्तीं धाक परि जवळी अनंत । तुका ह्मणे घात होऊं नेदी ॥ ५ ॥

॥ ६७२७ ॥ नेदी दुःख देवो दासा नारायण । ठेवी निवारून आ-
पया आधीं ॥ १ ॥ आधीं पुढें शुद्ध करावा मारग । दासांमागें मग सुखरूप
॥ २ ॥ पर्वतासी हात लाविला अनंतें । तो जाय वरतें आपेंआप ॥ ३ ॥
आपल्या आपण उचलिला गिरी । गोपाळ हे करी निमित्यासी ॥ ४ ॥ नि-
मित्य करूनी करावें कारण । करितां आपण कळों नेदी ॥ ५ ॥ दीनाचा
कृपाळू पतितपावन । हें करी वचन साच खरें ॥ ६ ॥ सांगणें न लगे
सुखदुःख दासा । तुका ह्मणे ऐसा कृपावंत ॥ ७ ॥

॥ ६७२८ ॥ कृपावंतें हाक दिली सकळिकां । माजिया रे नका राहों
कोणी ॥ १ ॥ निघाले या भेणें पाउसाच्या जन । देखे गोवर्धन उचलिला
॥ २ ॥ लाविले गोपाळ फेरीं चहूंकडे । हांसे फुंदे रडे कोणी धाकें ॥ ३ ॥
धाकें हीं सकळ निघालीं भीतरी । उचलिला गिरी तयाखालीं ॥ ४ ॥ तया
खालीं गाई वत्सें आलीं लोक । पक्षी सकळीक जीवजाति ॥ ५ ॥ जिहीं

ह्मणविलें हरीचे अंकित । जातीचे ते होत कोणी तरी ॥ ६ ॥ जाति कुळ नाहीं तयासी प्रमाण । अनन्या अनन्य तुका ह्मणे ॥ ७ ॥

॥ ६७२९ ॥ त्यांसी राखे बळें आपुले जे दास । कळिकाळासी वास पाहों नेदी ॥ १ ॥ पाउस न येतां केली यांची धार । लागला तुषार येऊं मग ॥ २ ॥ येऊनी दगड बैसतील गिरी । वरुषला धारीं शिळांचिये ॥ ३ ॥ शिळांचिये धारीं वरुषला आकांत । होता दिवस सात एक सरें ॥ ४ ॥ एक सरें गिरी धरिला गोपाळीं । होतों भाव बळी आम्ही ऐसें ॥ ५ ॥ ऐसें कळों आलें देवाचिया चित्ता । ह्मणे तुह्मी आतां हात सोडा ॥ ६ ॥ हांसती गोपाळ करूनी नवल । आइकोनी बोल गोविंदाचे ॥ ७ ॥ दावितील डोया गुढघे कोपर । फुटले ते भार उचलितां ॥ ८ ॥ भार आ-ह्मांवरी घालूनी निराळा । राहिलासी डोळा चुकवूनी ॥ ९ ॥ निमित्य अंगुळी लावियेली वरी । पाहों कैसा गिरी धरितोसी ॥ १० ॥ सिणले हे होते ठायींच्या त्या भारें । लटिकेंचि खरें मानूनियां ॥ ११ ॥ यांणीं अंत पाहों आदरिला याचा । तुका ह्मणे वाचा वाचाळ ते ॥ १२ ॥

॥ ६७३० ॥ वाचाळ लटिके अभक्त जे खळ । आपुलें तें बळ वाखा-णावें ॥ १ ॥ बळें हुंबरती सत्य त्यां न कळे । नुघडती डोळे अंधळयांचे ॥ २ ॥ आसुडिल्या माना हात पाय नेटें । तंव भार बोटें उचालिला ॥ ३ ॥ लटिका-चि आम्ही सीण केला देवा । कळों आलें तेव्हां सकळांसी ॥ ४ ॥ आलें कळों तुका ह्मणे अनुभवें । मग अहंभावें सांडवलें ॥ ५ ॥

॥ ६७३१ ॥ सांडवले सकळांचे अभिमान । आणिले शरण लोटांगणीं ॥ १ ॥ लोटांगणीं आले होऊनियां दीन । मग नारायण म्हणे भले ॥ २ ॥ भला आजी तुम्ही केला साच पण । गिरि गोवर्धन उचलिला ॥ ३ ॥ ला-गती चरणा सकळ ते काळीं । आम्हांमध्यें बळी तूंचि एक ॥ ४ ॥ एका तुजविण न यों आम्ही कामा । कळों कृष्णा रामा आलें आजी ॥ ५ ॥ आजिवरी आम्हां होता अभिमान । नेणतां चरणमहिमा तुझा ॥ ६ ॥ तुझा पार आह्मी नेणों नारायणा । नखीं गोवर्द्धना राखियेलें ॥ ७ ॥ राखियेलें गोकुळ आह्मां सकळांसी । दगडाच्या रासी वरुषतां ॥ ८ ॥ वर्णावें तें काय तुझें महिमान । धरिती चरण सकळही ॥ ९ ॥ सकळही तान विसरलीं भूक । सकळही सुख दिलें त्यांसी ॥ १० ॥ त्यांसी कळों आला वैकुंठनायक । तुका ह्मणे लोक निर्भर ते ॥ ११ ॥

॥ ६७३२ ॥ लोकां कळों आला देव आह्मांमधीं । टाकिली उपाधि
तेहीं शंका ॥ १ ॥ शंका नाहीं थोरां लहानां जीवांसी । कळला हा हृषी-
केशी मग ॥ २ ॥ मग मनीं झाले निर्भर सकळ । संगें लोकपाळ कृष्णाचिया
॥ ३ ॥ कृष्णाचिया ओंव्या गाणें गाती गीत । कृष्णमय चित्त झालें त्यांचें
॥ ४ ॥ त्यांसी ठावा नाहीं बाहेरील भाव । अंतरींच वाव सुख झालें ॥ ५ ॥
सुखें तया दीस न कळे हे राती । अखंड या ज्योती गोविंदाची ॥ ६ ॥
चिंतनेंचि धालीं न लगे अन्नपाणी । तुका ह्मणे मनीं समाधान ॥ ७ ॥
॥ ६७३३ ॥ समाधान त्यांचीं इंद्रियें सकळ । जयां तो गोपाळ समा-
गमें ॥ १ ॥ गोविंदाचा झाला प्रकाश भीतरी । मग त्यां बाहेरी काय काज
॥ २ ॥ काज काम त्यांचे सरले व्यापार । नाहीं आप पर माझें तुझें ॥ ३ ॥
माया सकळांची सकळां ही वरी । विषम तें हरि दिसों नेदी ॥ ४ ॥ दिसे
तयां आप परावें सारिखें । तुका ह्मणे सुखें कृष्णाचिया ॥ ५ ॥
॥ ६७३४ ॥ कृष्णाचिया सुखें भूक नाहीं तान । सदा समाधान सक-
ळांचें ॥ १ ॥ कळलेंचि नाहीं झाले किती दिस । बाहेरील वास विसरलीं
॥ २ ॥ विसरु कामाचा तुका ह्मणे झाला । उद्वेग राहिला जावें यावें ॥ ३ ॥
॥ ६७३५ ॥ जावें बाहेरी हा नाठवे विचार । नाहीं समाचार ठावा
कांहीं ॥ १ ॥ कांहीं न कळे तें कळों आलें देवा । मांडिला रिघावा कवतुक
॥ २ ॥ कवतुकासाठीं भक्त देहावरी । आणिताहे हरि बोलावया ॥ ३ ॥
यासी नांव रूप नाहीं हा आकार । कळला साचार भक्तां मुखें ॥ ४ ॥ मुखें
भक्तांचिया बोलतो आपण । अंगसंगें भिन्न नाहीं दोघे ॥ ५ ॥ दोघे वेगळा-
ले लेखील जो कोणी । तयाचा मेदिनी बहु भार ॥ ६ ॥ तयासी घडलीं
सकळही पापें । भक्तांचिया कोपें निंदा द्वेषें ॥ ७ ॥ द्वेषियाचा संग न घडा-
वा कोणा । विष जेंवीं प्राणा नाश करी ॥ ८ ॥ करितां आइके निंदा या
संतांची । तया होती तेचि अधःपात ॥ ९ ॥ पतन उद्धार संगाचा महिमा ।
त्यजावें अधमा संतसेवीं ॥ १० ॥ संतसेवीं जोडे महालाभरासी । तुका
ह्मणे यासी नाश नाहीं ॥ ११ ॥
॥ ६७३६ ॥ नाहीं नाश हरि आठवितां मुखें । जोडतील सुखें सकळ-
हीं ॥ १ ॥ सकळही सुखें वोळलीं अंतरीं । मग त्याबाहेरी काय काज
॥ २ ॥ येऊं विसरलीं बाहेरी गोपाळें । तल्लीन सकळें कृष्णसुखें ॥ ३ ॥
सुख तें योगियां नाहीं समाधीस । दिलें गाई वत्स पशु जीवां ॥ ४ ॥ वार-
ला पाऊस केव्हां नाहीं ठावा । तुका ह्मणे देवावांचूनियां ॥ ५ ॥

॥ ६७३७ ॥ यांसी समाचार सांगतों सकळा । चलावें गोकुळा [illegible] देव ॥ १ ॥ देव राखे तया आडलिया काळें । देव सुखफळें देतो दास ॥ २ ॥ दासां दुःख देखों नेदी आपुलिया । निवारी आलिया न कळत ॥ ३ ॥ नाहीं मेघ येतां जातां देखियेला । धारीं वरुषला शिळांचिये ॥ ४ ॥ एवढें भक्तांचें सांकडें अनंता । होय निवारिता तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६७३८ ॥ काकुळती एकें पहाती बाहेरी । तया ह्मणे हरि वोसरला ॥ १ ॥ वोसरला मेघ आला होता काळ । बाहेरी सकळ आले लोक ॥ २ ॥ कवतुक झालें ते काळीं आनंद । कळला गोविंद साच भावें ॥ ३ ॥ भावें तया पुढें नाचती सकळें । गातील मंगळें ओंव्या गीत ॥ ४ ॥ गीत गाती ओंव्या रामकृष्णावरी । गोपाळ मोहोरी वाती पावे ॥ ५ ॥ वत्सें गाई पशु नाचती आनंदें । वेधलिया छंदें गोविंदाच्या ॥ ६ ॥ चित्त वेधियेलें गोविंदें जयाचें । कोण तें दैवाचें तयाहूनी ॥ ७ ॥ तयाहूनी कोणी नाहीं भाग्यवंत । असंख्य सांगात गोविंदाचा ॥ ८ ॥ गोविंदाचा संग तुका ह्मणे ध्यान । गोविंद ते जन गोकुळींचे ॥ ९ ॥

॥ ६७३९ ॥ गोकुळींची गति कोण जाणे परि । पाठीं आला वरी इंद्रराव ॥ १ ॥ इंद्रापाशीं मेघ बोलती वडीवार । सकळ संहार करुनी आलों ॥ २ ॥ आतां जीव नाहीं सांभाळा ते रानीं । पुरिलें पाषाणीं शिळाधारीं ॥ ३ ॥ रिता कोठें नाहीं राखों दिला ठाव । जल्पती ते भाव न कळतां ॥ ४ ॥ न कळतां देव घडे धुंगरती । साच ते पावती अपमान ॥ ५ ॥ मान न कळतां केली सोंडपिटी । इंद्र आला दृष्टी पाहावया ॥ ६ ॥ पाहती तें आहे जैसें होतें तैसें । नाचती विशेषें तुका म्हणे ॥ ७ ॥

॥ ६७४० ॥ नाचतां देखिलीं गाई वत्सें जन । विस्मित होऊन ठाकला ॥ १ ॥ लागला पाऊस शिळांचिये धारीं । सांपडलीं हीं परी कैसी येथें ॥ २ ॥ येथें आहे नारायण संदेह नाहीं । विघ्न केलें ठायीं निर्विघ्न तें ॥ ३ ॥ विचारितां उंचलिला गोवर्द्धन । अवतार पूर्ण कळों आला ॥ ४ ॥ आला गौळियांच्या घरा नारायण । करितो स्तवन इंद्र त्यांचें ॥ ५ ॥ त्यांच्या पुण्या पार कोण करी लेखा । न कळे चतुर्मुखा अनंतासी ॥ ६ ॥ सीणलां जो ध्यानां नये एकलेग । तो तया गोपाळां समागमें ॥ ७ ॥ समागमें गाई वत्स पुरुषील । देह [illegible] संतसंग ॥ ८ ॥ [illegible] आला माथापायां लोटांगणीं । आलिंगिली प्रेमें [illegible] ॥ ९ ॥ करिती हे वाचे स्तुति सकळीक । देव इंद्रादिक

गोविंदाची ॥ १० ॥ करितील वृष्टि पुष्पवरुषाव । देवाआदिदेव पूजियेला ॥ ११ ॥ पुष्पांजुळी मंत्रघोष जयजयकार । दुमदुमी अंबर येणें नादें ॥ १२ ॥ नाचत्या अमर गंधर्वांचीं गाणीं । आनंद भुवनीं न माये तो ॥ १३ ॥ तो सुखसोहळा अनुपम्य रासी । गोकुळीं देवाती दोहीं ठायीं ॥ १४ ॥ दोहीं ठायीं सुख दिलें नारायणें । केला दुरुपदें वैरभाव ॥ १५ ॥ भावना भेदाची ठाय उठाउठी । तुका ह्मणे भेटी गोविंदाचें ॥ १६ ॥

॥ ६७४१ ॥ गोविंदाचें नाम गोड घेतां वाचे । तेथें हे कईचे वैरभाव ॥ १ ॥ भावें नमस्कार घातले सकळीं । लोटांगणें तळीं महीवरी ॥ २ ॥ वरी हातबाहे उभारिली देवें । कवळीसा भावें सकळांच्या ॥ ३ ॥ सकळ ही वरी बुडविले स्थळा । चलावें गोपाळां ह्मणे घरा ॥ ४ ॥ राहिली हीं नाचों गोविंदाच्या बोलें । पडिलीसा डोळें छंदें होतीं ॥ ५ ॥ छंद तो नावरे आपणा आपला । आनंदाचा आला होता त्यांसी ॥ ६ ॥ त्यांच्या तुका ह्मणे आनंदें सकळ । येणें गोपाळ समागमें ॥ ७ ॥

॥ ६७४२ ॥ समागमें असे हरि नेणतियां । नेदी जाऊं वांयां अंकितांसी ॥ १ ॥ अंकितां सावध केलें नारायणें । गोपाळ गोधनें सकळही ॥ २ ॥ सकळही जन आले गोकुळासी । आनंद मानसी सकळांच्या ॥ ३ ॥ सकळांचा केला अंगीकार देवें । न कळतां भावें वांचवी त्यां ॥ ४ ॥ त्यां झाला निर्धार हरि आह्मांपासीं । निवांत मानसीं निर्भर तीं ॥ ५ ॥ निर्भर हे जन गोकुळींचे लोक । केले सकळीक नारायणें ॥ ६ ॥ नारायण भय येऊं नेदी गांवा । तुका ह्मणे नावां अनुसरे त्या ॥ ७ ॥

॥ ६७४३ ॥ ये दशे चरित्र केलें नारायणें । रांगतां गोधनें राखिताहे ॥ १ ॥ हें सोंग सारिलें या रूपें अनंतें । पुढें हि बहु तें करणें आहे ॥ २ ॥ आहे तुका ह्मणे धर्मसंस्थापणें । केला नारायणें अवतार ॥ ३ ॥

॥ ६७४४ ॥ अवतार केला संहाराया दुष्ट ॥ करिती हे नष्ट परपीडा ॥ १ ॥ परपीडा करी दैत्य कंसराव । पुढें तो हि भाव आरंभिला ॥ २ ॥ आरंभिलें लाघव पाहोनियां संधि । सकळांहीं वधी दुष्टजन ॥ ३ ॥ दुष्टजन परपीडक जे कोणी । ते या चक्रपाणी न साहती ॥ ४ ॥ न साहवे दुःख भक्तांचें या देवा । अवतार घ्यावा लागे रूप ॥ ५ ॥ रूप हे चांगलें राम कृष्ण नाम । हरे भवश्रम उच्चारितां ॥ ६ ॥ उच्चारितां नाम कंस वैरभावें । रोवियां जिवें कृष्ण केला ॥ ७ ॥ कृष्णरूप त्याची दिसे आवघें जन ।

पाहे तो आपण कृष्ण झाला ॥ ८ ॥ पाहिलें दर्पणीं आधिल्या मुखासी। चतुर्भुज त्यासी तोचि झाला ॥ ९ ॥ झालीं कृष्णरूप कन्या पुत्र भाज। तुका ह्मणे राज्य सैन्य जन ॥ १० ॥

॥ ६७४५ ॥ सैन्य जन हांसे राया झालें काई। वासपे तो ठायीं आपणासी ॥ १ ॥ आपणा आपण जयास तीं तैसीं । वैरभाव ज्यांसी भक्ति नाहीं ॥२॥ नाहीं याचा त्याचा भाव एकविध। ह्मणऊनी छंद वेगळाले ॥ ३ ॥ वेगळाल्या भावें ते तया हांसती । तयास दिसती अवघीं हरि ॥ ४ ॥ हरि ला कंसाचा जीवभाव देवें। द्वेषाचिया भावें तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६७४६ ॥ द्वेषाचिया ध्यानें हरिरूप झाले। भाव हारपले देहादिक ॥ १ ॥ देहादिक कर्मे अभिमान वाढे। तया कंसा जोडे नारायण ॥ २ ॥ नारायण जोडे एकविध भावें। तुका ह्मणे जीवें जाणें लागे ॥ ३ ॥

॥ ६७४७ ॥ जीवभाव त्याचा गेला अभिमान। ह्मणऊनि जन हांसे कंसा ॥ १ ॥ सावध करितां नये देहावरी। देखोनियां दुरी पळे जन ॥ २ ॥ जन वन हरि झालासे आपण। मग हे लोचन झांकियेले ॥ ३ ॥ झांकूनी लोचन मौन्येंचि राहिला । नाहीं आतां बोलायाचें काम ॥ ४ ॥ बोलायासी दुजें नाहीं हें उरलें। जन कृष्ण झालें स्वयें रूप ॥ ५ ॥ रूप पालटलें गुण नाम याति। तुका म्हणे भूतीं देव झाला ॥ ६ ॥

॥ ६७४८ ॥ झालों स्वयें कृष्ण आठव हा चित्तीं । भेदें भयवृत्ति उरली आहे ॥ १ ॥ उरली आहे रूप नांव दिसे भिन्न। मी आणि हा कृष्ण आठवतो ॥ २ ॥ तोंवरी हा देव नाहीं तयापासीं। आला दिसे त्यासी तोचि देव ॥ ३ ॥ देवरूप त्याची दिसे वरी काया। अंतरीं तो भयाभीत भेदें ॥ ४ ॥ भेदें तुका म्हणे अंतरे गोविंद। साचें विण छंद वांयां जाय ॥ ५ ॥

॥ ६७४९ ॥ वांयां तैसे बोल हरिशीं अंतर। केले होती चार भयभेदें ॥ १ ॥ भेद भय गेले नोळखे आपणा। भेटी नारायणा कंसा झाली ॥ २ ॥ झाली भेटी कंसा हरीशीं निकट। सन्मुखचि नीट येरयेरां ॥ ३ ॥ येरयेरां भेटी युद्धाच्या प्रसंगीं। साचें शस्त्र अंगीं हाणितलें ॥ ४ ॥ त्याचें वर्म होतें ठावें या अनंता। तुका ह्मणे सत्तानायक हा ॥ ५ ॥

॥ ६७५० ॥ नारायणें कंस चाणुर मर्दिला। राज्यीं बैसविला उग्रसेन ॥ १ ॥ उग्रसेन स्थापियेला शरणागत। पुरविला अंत अभक्ताचा ॥ २ ॥ अवघेंचि केलें कारण अनंतें। आपुलिया हातें सकळ ही ॥ ३ ॥ सकळही

केलीं आपलीं अंकित । राहे गोपिनाथ मथुरेसी ॥ ४ ॥ मथुरेसी आला वैकुंठनायक ॥ झालें सकळीक एक राज्य ॥ ५ ॥ राज्य दिलें उग्रसेना शरणागता । सोडविलीं माता पिता दोन्ही ॥ ६ ॥ सोडवणे धांवे भक्ताच्या कैवारें । तुका ह्मणे करें शस्त्र धरी ॥ ७ ॥

॥ ६७५१ ॥ धरी दोहीं ठायीं सारखाचि भाव । देवकी वसुदेव नंद दोघे ॥ १ ॥ दोन्ही एके ठायीं केल्या नारायणें । वाढविला तिणें आणि व्याली ॥ २ ॥ व्याला वाढला हा आपल्या आपण । निमित्या कारणें माय बाप ॥ ३ ॥ माय हा जगाची बाप नारायण । दुजा करी कोण यत्न यासी ॥ ४ ॥ कोण जाणे याचे अंतरींचा भाव । कळों नेदी माव तुका म्हणे ॥ ५ ॥

॥ ६७५२ ॥ दिनाचा कृपाळू दुष्टजना काळ । एकला सकळ व्यापक हा ॥ १ ॥ हांसे बोले तैसा नव्हे हा अनंत । नये पराकृत ह्मणों यासी ॥ २ ॥ यासी कळावया एक भक्तिभाव । दुजा नाहीं ठाव धांडोळितां ॥ ३ ॥ धांडोळितां श्रुति राहिल्या निश्चित । तो करी संकेत गोपिसवें ॥ ४ ॥ गोपिकांची वाट पाहे द्रुमातळीं । मागुता न्याहाळीं न देखतां ॥ ५ ॥ न देखता त्यांसी उठे बैसे पाहे । वेढावला राहे वेळोवेळां ॥ ६ ॥ वेळोवेळां पंथ पाहे गोपिकांचा । तुका ह्मणे वाचा नातुडे तो ॥ ७ ॥

॥ ६७५३ ॥ तो बोले कोमळ निष्ठुर साहोनी । कोपतां गौळणी हास्य करी ॥ १ ॥ करावया दास्य भक्तांचें निर्लज्ज । कवतुकें रज माथां वंदी ॥ २ ॥ दिलें उग्रसेना मथुरेचें राज्य । सांगितलें काज करी त्याचें ॥ ३ ॥ त्यासी होतां कांहीं अरिष्ट निर्माण । निवारी आपण शरणागता ॥ ४ ॥ तयांसाठीं शरणागता राखे सर्वभावें हरि । अवतार धरी तयांसाठीं ॥ ५ ॥ तयांसाठीं वाहे सुदर्शन गदा । उभा आहे सदा सांभाळीत ॥ ६ ॥ तळमळ नाहीं तुका ह्मणे चित्ता । भक्तांचा अनंता भार माथां ॥ ७ ॥

॥ ६७५४ ॥ मारिले असुर दाटिले मेदिनी । होते कोणा कोणी पीडित ते ॥ १ ॥ ते हा नारायण पाठवी अघोरा । संतांच्या मत्सरा घातावरी ॥ २ ॥ वरिले ते दूतीं यमाचिये दंडीं । नुच्चारितां तोंडीं नारायण ॥ ३ ॥ नारायण नाम नावडे जयांसी । ते झाले मिरासी कुंभपाकीं ॥ ४ ॥ कुंभपाकीं सेल मान तो तयांचा । तुका ह्मणे वाचा संतनिंदा ॥ ५ ॥

॥ ६७५५ ॥ वास नारायणें केला मथुरेसी । वधूनी दुष्टांसी नवे ठायीं ॥ १ ॥ कारीं सिंहासनाचे स्थानी उग्रसेन । भाविकाची जनासहित केलीं ॥ २ ॥ केलें दुःख नाहीं स्मरील आठव । देखियेला देव हरी त्यांनीं ॥ ३ ॥ देवोवेनियां देवा विसरलीं कंसा । ठावा नाहीं ऐसा झाला येथें ॥ ४ ॥ ऐसें दुजा कोणी नाहीं कृष्णाविणें । ऐसें वाटे मनें काया वाचा ॥ ५ ॥ काया वाचा मन कृष्णीं रत झालें । सकळां लागलें कृष्णध्यान ॥ ६ ॥ ध्यान गोविंदाचें लागलें या लोकां । निर्भर हे तुका म्हणे चित्तीं ॥ ७ ॥

॥ ६७५६ ॥ चिंतिलीं पावलें जसीं कृष्णभेटी । परवीं ते आटी वांयांविण ॥ १ ॥ वासना धरिती कृष्णाविणें कांहीं । सीण केला तिहीं साधनांचा ॥ २ ॥ चाळविले इवें एक अहंकारें । भोग जन्मांतरें न चुकती ॥ ३ ॥ न चुकती भोग तरें दानें मनें । एका त्या अनंतें वांचूनियां ॥ ४ ॥ चुकवूनी जन्म दाखवी आपणा । भजा नारायणा तुका म्हणे ॥ ५ ॥

॥ ६७५७ भजल्या गोपिका सर्व भावें देवा । नाहीं चित्तीं हेवा दुजा कांहीं ॥ १ ॥ दुजा छंद नाहीं तयांचिये मनीं । जागृति सपनीं कृष्णध्यान ॥ २ ॥ ध्यान ज्यां हरीचें हरिसी तयांचें । चित्त ग्वाही ज्यांचें तैसा भावें ॥ ३ ॥ मागें धूर्व पूर्णे आठविती लोक । अवघे सकळीक मथुरेचे ॥ ४ ॥ मथुरेचे लोक सुखी केले जन । तेथें नारायण राज्य करी ॥ ५ ॥ राज्य करी गोपिपाद्यांसहित । कमिळें बहुतकाळ तेथें ॥ ६ ॥ तेथें दैत्यीं उपसर्ग केला लोकां । रचिली द्वारका तुका म्हणे ॥ ७ ॥

॥ ६७५८ ॥ रचियेला गांव सागराचे पोटीं । जडोनी गोमटीं नाना-रत्नें ॥ १ ॥ रत्नें खणोखणीं सोनियाच्या भिंती । लागलिया ज्योति रवि-कळा ॥ २ ॥ कळा सकळ ही गोविंदाचे हातीं । मंदिरें निगुती उभारिलीं ॥ ३ ॥ उभारिलीं दुर्गें दारवंडे कांजी । कोटि चर्यापाजी शोभलिया ॥ ४ ॥ शोभलें उत्तम गांव सागरांत । सकळांसहित आले हरि ॥ ५ ॥ आला नारायण द्वारका नगरा । उदार या शूरा मुगुटमणि ॥ ६ ॥ निवडीना याति समानचि केलीं । टणक धाकुलीं नारायणें ॥ ७ ॥ नारायणें दिलीं अक्षई मंदिरें । अभंग साचारें सकळांसी ॥ ८ ॥ सकळ ही धर्मशीळ पुण्यवंत । पवित्र विरक्त नारीनर ॥ ९ ॥ रचिलें तें देवें न मोडे कवणा । बळियांचा राणा नारायण ॥ १० ॥ बळबुद्धीनें तीं देवाच सारखीं । तुका म्हणे मुखीं गातीं ओंव्या ॥ ११ ॥

॥ ६७५९ ॥ गाती ओंव्या कामें करितां सकळें । हालवितां बाळें देवावरी ॥ १ ॥ ऋद्धिसिद्धि दासी दारीं ओळंगती । सकळ संपत्ति सर्वां घरीं ॥ २ ॥ घरीं बैसलिया जोडलें निधान । करिती कीर्तन नरनारी ॥ ३ ॥ नारीनर लोक धन्य त्यांची याति । ज्यांसी संगति गोविंदाची ॥ ४ ॥ गोविंदें गोविंद केले लोकपाळ । चिंतनें सकळ तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६७६० ॥ कांहीं चिंता कोणा नाहीं कोणेविशीं । करी द्वारकेसी राज्य देव ॥ १ ॥ द्वारकेसी राज्य करी नारायण । दुष्ट संहारून धर्म पाळी ॥ २ ॥ पाळी वेदआज्ञा ब्राह्मणांचा मान । अतीतपूजन वैष्णवांचें ॥ ३ ॥ अतीत पाळित अवघियां वेगळा । नाहीं हा गोपाळा अभिमान ॥ ४ ॥ अभिमान नाहीं तुका ह्मणे त्यासी । नेदी आणिकांसी धरूं देव ॥ ५ ॥

॥ ६७६१ ॥ धरियेलें रूप कृष्ण नाम बुंधी । परब्रह्म क्षिती उतरलें ॥ १ ॥ उत्तम तें नाम राम कृष्ण जगीं । तरावयालागीं भवनदी ॥ २ ॥ दीनानाथ ब्रिदें रुळती चरणीं । वंदितील मुनि देव ऋषि ॥ ३ ॥ ऋषी मुनी भेटी दिली नारायणें । आधिक कारणें बहु केलीं ॥ ४ ॥ बहु कासावीस झाला भक्तांसाठीं । तुका ह्मणे आटी सोसियेली ॥ ५ ॥

॥ ६७६२ ॥ सोसियेली आटी गर्भवास फेरे । आयुधांचे भारे वागविलां ॥ १ ॥ वाहोनी सकळ आपुलिये माथां । भार दासां चिंता नाहीं नेदी ॥ २ ॥ नेदी काळाचिये हातीं सेवकांसी । तुका ह्मणे ऐसी ब्रीदावळी ॥ ३ ॥

॥ ६७६३ ॥ ब्रीदावळी ज्याचे रुळते चरणीं । पाउलें मेदिनी सुखावे गा ॥ १ ॥ सुखावे मेदिनी कृष्णाचिये चाली । कुंकुमें शोभलीं होय रेखा ॥ २ ॥ होऊनी भ्रमर पाउलांचें सुख । घेती भक्त मुख लावूनियां ॥ ३ ॥ दासांसाठीं धरियेला अवतार । सुख दिलें फार निज दासां ॥ ४ ॥ निजसुख तुका ह्मणे भक्तां ठावें । तिहींच जाणावें भोगूं त्यांसी ॥ ५ ॥

॥ ६७६४ ॥ भोगिका गोपिका यादवां सकळां । गौळणि गोपाळां आइत्यांसी ॥ १ ॥ गाती धणीवरी केला अंगसंग । पाहिला श्रीरंग डोळेभरी ॥ २ ॥ भक्ति नवविधा त्यांसी घडली । अवघींच केली कृष्णरूप ॥ ३ ॥ रूप पालटिलें एका भिन्न भाव । भक्त आणि देव भिन्न नाहीं ॥ ४ ॥ नाहीं पाहों दिलें जातां निजधामा । तुका ह्मणे आह्मांसहित गेला ॥ ५ ॥

॥ ६७६५ ॥ गेला कोठें होता कोठूनियां आला । सहज व्यापला आहे नाहीं ॥ १ ॥ आहे साच भावें सकळव्यापक । नाहीं अभाविक लोकां कोठें ॥ २ ॥ कोठें नाहीं ऐसा नाहीं रिताठाव । अनुभवी देव स्वयें झाले ॥ ३ ॥ जातों येतों आह्मी देवाचे सांगात । तुका ह्मणे गात देवनाम ॥ ४ ॥

॥ ६७६६ ॥ मना वाटे तैसीं बोलिलों वचनें । केली धीटपणें सलगी देवा ॥ १ ॥ वाणी नाहीं शुद्ध याति एक ठाव । भक्ति नेणें भाव नाहीं मनीं ॥ २ ॥ नाहीं झालें ज्ञान पाहिलें अक्षर । मानी जैसें थोर थोरीं नाहीं ॥ ३ ॥ नाहीं मनीं लाज धरिली आशंका । नाहीं भ्यालों लोकां चतुरांसी ॥ ४ ॥ चतुरांच्या राया मी तुझें अंकित । झालों शरणागत देवदेवा ॥ ५ ॥ देवा आतां करीं सरतीं हीं वचनें । तुझ्या कृपादानें बोलिलों तीं ॥ ६ ॥ तुझें देणें तुझ्या समर्पूनीं पायीं । झालों उतरायी पांडुरंगा ॥ ७ ॥ रंकाहुनी रंक दास मी दासांचें । सामर्थ्य हें कैचें बोलावया ॥ ८ ॥ बोलावया पुरे वाचा माझी कायी । तुका ह्मणे पायीं ठाव द्यावा ॥ ९ ॥

॥ ६७६७ ॥ चारी वेद ज्याची कीर्ति वाखाणिती । प्रत्यक्ष ये मूर्ति विठोबाची ॥ १ ॥ चहुं युगांचें हें साधन साधिलें । अनुभवा आलें आपुलिया ॥ २ ॥ एवढें करूनी आपण निराळा । प्रत्यक्ष हें डोळां दाखविलें ॥ ३ ॥ दावूनि सकळ प्रमाणाच्या युक्ति । जयजयकार करिती अवघे भक्त ॥ ४ ॥ भक्ति नवविधा पावली मुळची । जनार्दननामाची संख्या झाली ॥ ५ ॥ नवसें ओंव्या आदरें वाचितां । साच्या मनोरथा कार्यासिद्धि ॥ ६ ॥ सीमा न करवे आणीक ही सुखा । तुका ह्मणे देखा पांडुरंगा ॥ ७ ॥

काला चेंडूफळी.

॥ ६७६८ ॥ झेला रे झेला वरचेवर झेला । हातिंचे गमावी तो पाठी साहे टोला ॥ १ ॥ त्रिगुणांचा चेंडू हातें झुगारी निराळा । वरिलिया मुखें मन लावी तेथें डोळा ॥ २ ॥ आगळा होऊनि धरि वरिचिया वरी । चपल तो जिंके गांड्या ठके येरझारीं ॥ ३ ॥ हातीं सांपडलें उभें बैसो नेदी कोणी । सोरी मागें सोरी वेती ओणवें करूनी ॥ ४ ॥ डाईं पडिलिया सोसी दुःखाचे डोंगर । पाठीवरी भार भोंवताही उभा फेर ॥ ५ ॥ तुका ह्मणे सुख पाहे तयाचें आमळें । जिंकितो हरीसी कोणी एका तरी काळें ॥ ६ ॥

॥ ६७६९ ॥ अझुनि कां थीर पोरा न ह्मणसी फिर । धरूनियां धीर लाजे बुर निघाला ॥ १ ॥ मोकळा होतासी कां रे पडिलासी डाईं । वरिलांचा भार आतां उतरेसा नाहीं ॥ २ ॥ मेळवूनी मेळा एकाएकीं दिली मिठी । कवळिलें एक बहु बैसविलीं पाठीं ॥ ३ ॥ तळील तें वरी वरील तें येतें तळा । न सुटे तोंवरी येथें गुंतलिया खेळा ॥ ४ ॥ सांडितां ठाव पुढें सईल धरी हात । चढेल तो पडेल ऐसी ऐका रे मात ॥ ५ ॥ तुका ह्मणे किती आवरावे हात पाय । न खेळावें तोंच बरें वरी न ये डाय ॥ ६ ॥

कोडें.

॥ ६७७० ॥ कोडें रे कोडें ऐका हें कोडें । उगवूनी फार राहे गुंतोनियां थोडें ॥ १ ॥ पुसतसे सांगा मी हें माझें ऐसें काई । रुसूं नका नुगवे तो झंवे आपुली आई ॥ २ ॥ सांगतों हें मूळ कांहीं न धरावी खंती । झालें जीवो मेलें मरो प्रारब्धा हातीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे अभिमान सांडावा सकळीं । नये अंगावरी वांयां येऊं देऊं कळी ॥ ४ ॥

॥ ६७७१ ॥ नुगवे तें उगवून सांगितलें भाई । घालूनियां ताळा आतां शुद्ध राखा घाई ॥ १ ॥ आतां कांहीं नाहीं राहिलें । म्यां आपणा आपण पाहिलें ॥ २ ॥ कमाईस मोल येथें नका रीस मानूं । निवडूं नये मज कोणा येथें वानूं ॥ ३ ॥ तुका ह्मणे पदोपदीं कान्हो वनमाळी । जयेजत मग सेवटिला एक वेळीं ॥ ४ ॥

॥ ६७७२ ॥ हरुष आनंदाचा । घोष करा हरिनामाचा ॥ कोण हा दैवाचा । भाग पावे येथील ॥ १ ॥ पुण्य पाहिजे बहुत । जन्मांतरींचें संचित ॥ होईल करीत । आला अधिकारी तो ॥ २ ॥ काय पाहातां हे भाई । हरुषें नाचा धरा घाई ॥ पोटभरी कांहीं । घेतां उरी न ठेवा ॥ ३ ॥ जें सुख दृष्टी आहे । तेंच अंतरीं जो लाहे ॥ तुका ह्मणे काय । कळिकाळ तें बापुडें ॥ ४ ॥

॥ ६७७३ ॥ अवघे गोपाळ ह्मणती या रे करूं काला । काय कोणाची सिदोरी ते पाहों द्या मला ॥ नका कांहीं मागें पुढें रे ठेवूं खरेंच बोला । वंची वंचला तोचि रे येथें भोवंडला त्याला ॥ १ ॥ घेतल्यावांचून झाडा रे नेदी आपुलें कांहीं । एका एक ग्वाही बहुत देती मोकळें नाहीं ॥ ताक सांडी येर येर रे काला भात भाकरी दहीं । आलें घेतो मध्यें बैसला नाहीं

आणवीत तें ही ॥ २ ॥ एका नाहीं धीर तांतडी दिल्या सोडोनी मोटा। एक सोडितिल गाठी रे एक चालती वाटा ॥ एक उभा भार वाहोनि पाहे उगाचि खोटा। एक ते करूनि आराले आतां ऐसेंचि घाटा ॥ ३ ॥ एकीं स्थिराविल्या गाई रे एक वळत्या देती। एकांच्या फांकल्या वोढाळा फेरे भोंवतीं घेती ॥ एकें चाराबोरा गुंतलीं नाहीं जीवन चित्तीं। एक एका चला ह्मणती एक हुंबरी घेती ॥ ४ ॥ एकीं एकें वाटा लाविलीं भोळीं नेणतीं मुलें। आपण घरींच गुंतले माळा नासिलीं फुलें ॥ गांठींचें तें सांडूं नावडे खाय आइतें दिलें। सांपडलें वेठी वोढी रे भार वाहतां मेलें ॥ ५ ॥ एक ते माया गुंतलें घरीं बहुत काम । वार्ता ही नाहीं तयाची तया कांहींच ठावें ॥ जैसें होतें शिळें संचित तैसें लागलें खावें। हातोहातीं गेलें वेचूनीं मग पडिलें ठावें ॥ ६ ॥ एकीं हातीं पायीं पटे रे अंगीं लाविल्या राखा। एक ते सोलिव बोडके केली सपाट शिखा ॥ एकते आळसी तळीं रे वरी वाढिल्या काखा। सिदोरी वांचून बुद्धि रे केला अवघ्यां वाखा ॥ ७ ॥ तुका ह्मणे आतां कान्होबा आह्मां वांटोनी द्यावें । आहें नाहीं आह्मांपाशीं तें तुज आववेंचि ठावें ॥ मोकाळितां तुह्मी शरण आह्मी कवणासी जावें। कृपावंते कृपा केली रे पोट भरे तों खावें ॥ ८ ॥

॥ ६७७४ ॥ बैसवूनी फेरी। गडियां मध्यभागीं हरी ॥ अवघियांचें करी। समाधान सारिखें ॥ १ ॥ पाहे तो देखे समोर। भोगी अवघे प्रकार । हरुषें झेली कर। कवळ मुखीं देती ते ॥ २ ॥ बोले बोलतिया सवें। देतील तें त्यांचें घ्यावें ॥ एक एका ठावें । येर येरा अदृश्य ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा। बहु आवडीचा हेवा ॥ कोणाचिया जीवा। वाटों नेदी विषम ॥ ४ ॥

॥ ६७७५ ॥ आह्मां निकट वासें। कळों आलें जैसें तैसें ॥ नाहीं अनारिसें। कान्होबाचे अंतरीं ॥ १ ॥ पीडती आपुल्या भावना । जैसी जयाची वासना ॥ कर्माचा देखणा। पाहे लीळा कौतुक ॥ २ ॥ खेळ खेळे न पडे डाईं। ज्याचा भार त्याच्या ठायीं ॥ कोणी पडतील डाईं । कोणी कोडीं उगवितीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे कवळ। हातीं घेऊनी गोपाळ ॥ देत ज्यांचें बळ। त्यांसी तैसा विभाग ॥ ४ ॥

॥ ६७७६ ॥ काम सारूनी सकळ। आले अवघे गोपाळ ॥ झाली आतां वेळ । ह्मणती आणा सिदोऱ्या ॥ १ ॥ देती आपुलाला झाडा। गाई बैसाविल्या वाडां ॥ दोंदिल बोबडा। वांकड्याचा हरि केली

॥ २ ॥ आपुलालिये आवडी । मुदा बांधल्या परवडी । निवडूनियां गोडी । हरि मेळवी त्यांत तें ॥ ३ ॥ भार वागविला खांदीं । नव्हती मिळाली जों मांदी ॥ सकळांचे संदीं । ओझीं अवघीं उतरलीं ॥ ४ ॥ मागे जो तांतडी । त्यासी रागा येती गडी ॥ तुझी कां रे कुडी । येथें मिथ्या भावना ॥ ५ ॥ एक एकाच्या संवादें । कैसे धाले ब्रह्मानंदें ॥ तुका ह्मणे पदें । या रे वंदूं हरीचीं ॥ ६ ॥

॥ ६७७७ ॥ यमुनें पावलीं । गडियां बोले वनमाळी । आणा सिदोऱ्या सकळी । काला करूं आजी ॥ अवघे एके ठायीं । करूनी स्वाद त्याचा पाहीं । ब्रजवासी आहे तें ही । तुम्हांमाजी देतों ॥ १ ॥ ह्मणती बरवें गोपाळ । ह्मणती बरवें गोपाळ । वाहती सकळ । मोहरी पांवे आनंदें ॥ खडकीं सोडियेल्या मोटा । आवघा केला एकवटा । काला करूनियां वांटा । गडियां देतो हरि ॥ २ ॥ एकापुढें एक । घाली हात पसरी मुख । गोळा पांवे तया सुख । अधिकाचि वाटे ॥ ह्मणती गोड झालें । ह्मणती गोड झालें । आणिक देई । नाहीं पोट धालें ॥ ३ ॥ हात नेतो मुखापासीं । येर अशा तोंड वासी । खाय आपण तयासी । दावी वांकुलिया ॥ देऊनियां मिठी । पळे लागतील पाठीं ॥ धरूनी काढितील ओठीं । मुखामाजी खातो ॥ ४ ॥ ह्मणती ठकडा रे कान्हा । लावी घांसा भरी राणा ॥ ढुम करितो शाहणा । पाठीवाटीं तयाच्या ॥ अवघियांचे खाय । कवळ कृष्णा माझी माय ॥ सुरवर ह्मणती हाय हाय । सुखा अंतरलों ॥ ५ ॥ एक एका मारी । ढुंगा पाठी तोंडावरी । गोळा न साहवे हरि । ह्मणे पुरे आतां ॥ येतो काकुलती । गोळा न साहवे श्रीपति । ह्मणे खेळों आतां नीती । सांगों आदरिलें ॥ ६ ॥ आनंदाचे फेरी । माजी घालूनियां हरी । एक घालिती हुंबरी । वाती सिंगें पांवे ॥ वांकडे बोबडे । खडे मुडे एक लुडे । कृष्णा आवडती पुढें । बहु भाविक ते ॥ ७ ॥ करी कवतुक । त्यांचें देखोनियां मुख । हरी वाटतसे सुख । खदखदां हांसे ॥ एक एकाचें उच्छिष्ट । खातां न मानिती वीट । केलीं लाजतां ही धीट । आपुलिया संगें ॥ ८ ॥ नाहीं ज्याची गेली भूक । त्याचें पसरावितो मुख । अवघियां देतो सुख । सारिखेंचि हरि ॥ ह्मणती भला भला हरी । तुझी संगति रे बरी । आतां चाळविसी तरी । न वजों आणिकां सवें ॥ ९ ॥ गाई विसरल्या चार । पक्षी श्वापदांचे भार । झालें यमुनेचें स्थिर । जळ वाहों ठेलें ॥ देव पाहाती सकळ । मुखें घोटुनियां लाळ ॥ धन्य ह्मणती गोपाळ । धिग

झालों आह्मी ॥ १० ॥ ह्मणती कैसें करावें । ह्मणती कैसें करावें । यमुनाजळीं न्हावें । मत्स्य शेप घ्यावया ॥ सुरवरांचे थाट । भरलें यमुनेचें तट । तंव अधिकाचि होंठ ॥ मटमटां वाजवी ॥ ११ ॥ आनंदें सहित । क्रीडा करी गोपीनाथ । ह्मणती यमुनेंत हात । नका धुऊं कोणी ॥ म्हणती जाणें जीवींचें । ह्मणती जाणे जीवींचें । लाजे त्यास येथें कैचें । शेष कृष्णाचें । लाभ थोरिवे ॥ १२ ॥ धन्य दिवस काळ । आजी पावला गोपाळ । म्हणती धालों रे सकळ । तुझियानि हातें ॥ मानवले गडी एक एकांचे आवडी । दहीं खादलें परवडी । धणीवरी आजी ॥ १३ ॥ तुझासंग बरवा । नित्य आह्मां द्यावा । ऐसें करूनी जीवा । नित्य देवा चालावें ॥ तंव ह्मणे वनमाळी । घ्यारे काठिया कांबळी । अता जाऊं खेळीमेळीं । गाई चारावया ॥ १४ ॥ तुका ह्मणे प्रेमें धालीं । कोणा न साहवे चाली । गाई गोपाळांसी केली । आपण यांसरी ॥ आजी झाला आनंद । आजी झाला आनंद । चाले परमानंद । सर्वे आह्मांसहित ॥ १५ ॥

॥ ६७७८ ॥ या हो या चला जाऊं सकळा । पाहों हा सोहळा आजि वृंदावनींचा ॥ १ ॥ वाइला गोपाळें वेणुनाद पडे कानीं । धीर नव्हे मनीं चित्त झालें चंचळ ॥ २ ॥ उरलें तें सांडा काम नका करूं गोवी । होचि वेळ ठावी मज कृष्णभेटीची ॥ ३ ॥ निवतील डोळे याचें श्रीमुख पाहातां । बोलती तें आतां घरचीं सोसूं वाईट ॥ ४ ॥ कृष्णभेटी आड कांहीं नावडे आणीक । लाज तरी लोक मन झालें उदास ॥ ५ ॥ एकाएकीं चालियेल्या सादावीत सर्वे । तुका ह्मणे देवें रूपें केल्या तन्मय ॥ ६ ॥

फुगड्या.

॥ ६७७९ ॥ फुगडी फू फुगडी घालितां उघटी राहे । लाज सांडोनि एकी पाहे ॥ १ ॥ फुगडी गे अवघें मोडी गे । तरीच गोडी गे संसार तोडी गे ॥ २ ॥ मागें जें शिकली होतीस पोटीं । तेंचि विचारूनी आतां उच्चारी ओठीं ॥ ३ ॥ त्रिगुणांची वेणी तुझे उडते पाठीं । सावरूनी धरी घाली सूक्ष्मदीं गांठी ॥ ४ ॥ आगळें पाउल जिंके एकाएक । पावसी मान हे मान

षती तिन्ही लोक ॥ ५ ॥ तुका ह्मणे तुजमजमध्यें एक भाव । सम तुकें बार
येऊं पावों उंच ठाव ॥ ६ ॥

॥ ६७८० ॥ फुगडी फू सवती माझे तूं । हागुनी भरलें धू तुझ्या ढुंगा
गोंडावरी थू ॥ १ ॥ फुगडी घेतां आली हरी । ऊठ जावो जगनोवरी ॥ २ ॥
हात पाय बेंबळ जाती । ढुंगण घोळितां लागे माती ॥ ३ ॥ सात पांच
आणिल्या हरी । वांचुनी काय तगसी पोरी ॥ ४ ॥ सरला दम पांगले पाय ।
अझुनी वरी घोळसी काय ॥ ५ ॥ तुका ह्मणे अझुन तरी । सांगितलें तें
गधडी करी ॥ ६ ॥

लखोटा.

॥ ६७८१ ॥ लये लये लखोटा । मूळवंदी कासोटा ॥ भावा केलें साहे ।
आतां माझें पाहें ॥ १ ॥ हातोहातीं गुंतली । जीवपणा मुकली ॥ धीर माझा
निका । सांडीं बोल फिका ॥ २ ॥ अंगीकारीं हरि । नको पडों फेरी ॥ लाज
धरीं भांडे । जग झोडी रांडे ॥ ३ ॥ बैस भावापाठीं । ऐक माझ्या गोष्टी ॥
केला सांडीं गोहो । येथें धरीं मोहो ॥ ४ ॥ पाठमोरा डोल । आवरी तें
बोल ॥ पांगलीस बाळा । पुढें अवकळा ॥ ५ ॥ आतां उभी ठायीं । उभा-
उभीं पाहीं ॥ नको होऊं हुकरी । पुढें गाढव कुतरी ॥ ६ ॥ नाम केलें खरें ।
आपुलें म्यां बरें ॥ तुका ह्मणे येरी । पांगविल्या पोरी ॥ ७ ॥

हुंबरी.

॥ ६७८२ ॥ तुशीं कोण घाली हुंबरी । साही पांगल्या अठरा चारी
सहस्र मुखावरी हरी । शेष शिणविलें ॥ २ ॥ चेंडुवासवें घातली उडी ।
नाथिला काळिया देऊनी बुडी ॥ ३ ॥ अशुद्ध पीतां करुणा नाहीं । तुवां
माउशी ही मारियेली ॥ ४ ॥ रावणाचें घर बुडविलें सारें । त्याचीं रांडा-
पोरें मारियेलीं ॥ ५ ॥ जाणों तो ठावा आहेसी आह्मां । तुवां आपुला मा-
मा मारियेला ॥ ६ ॥ याशीं खेळतां नाश थोरू । तुकयास्वामी सारं-
गधरू ॥ ७ ॥

हमामा.

॥ ६७८३ ॥ मशीं पोरा घे रे बार । तुझें बुजीन खालील द्वार ॥ १ ॥ पोरा हमामा रे हमामा रे ॥ २ ॥ मशीं हमामा तूं घालीं । पोरा वरी सां भाळीं खालीं ॥ ३ ॥ तरी च मशीं बोल । पोरा जिव्हाळ्याची ओल ॥ ४ ॥ मशीं घेतां भास । जीवा मीतूंपणा नास ॥ ५ ॥ मज सर्वे खरा । पण जाऊ नेदी घरा ॥ ६ ॥ आमुचिये रंगीं । दुजें तगेना ये संगीं ॥ ७ ॥ तुक्यासवें भास । हरी जीवा करी नास ॥ ८ ॥

॥ ६७८४ ॥ हमामा रे पोरा हमामा रे । हमामा घालितां ठकलें पोर । करी येरझार चौऱ्याशीची ॥ १ ॥ पहिले पहारा रंगासी आलें । सोहं सोहं सें वार घेतलें ॥ देखोनि गडी तें विसरलें । डाईं पडिलें आपणचि ॥ २ ॥ दुसऱ्या पहारा महा आनंदें । हमामा घाली छंदछंदें । दिस वाढे तों गोड वाटे । परि पुढें नेणे पोर काय होतें तें ॥ ३ ॥ तिसऱ्या पहारा घेतला बार । अहंपणें पाय न राहे स्थिर ॥ सोस सोस करितां डाईं पडसी । सत्य जाणें हा निर्धार ॥ ४ ॥ चौथ्या पहारा हमामा । घालिसी कांपविसी हातपाय । मुऱ्यापाटिलाचा पोर यम । त्याचे पडसील डाईं ॥ ५ ॥ हमामा घालिता भ्याला तुका त्यानें सांडिली गड्याची सोई । यादवांचा मूल एक विठोबा त्यासवें चारितो गाई ॥ ६ ॥

कांडण.

॥ ६७८५ ॥ सिद्ध करूनियां ठेविलें कांडण । मज सांगतीण शुद्ध बुद्धि गे ॥ १ ॥ आठव हा धरीं मज जागें करीं । मागिले पाहारीं सेवटींचा गे ॥ २ ॥ सम तुकें घाव घालीं वो साजणी । मी तुज मिळणी जंव मिळें ॥ ३ ॥ एक कशी पांखडी दुसरी निवडी । निःशेष तिसडी ओज करी ॥ ४ ॥ सरलें कांडण पाकसिद्धि करी । मेळवण क्षिरीसाकरेचें ॥ ५ ॥ उद्धव अक्रुर बंधु दोघेजण । बाप नारायण जेवणार ॥ ६ ॥ तुका ह्मणे मज माहेरी आवडी । ह्मणोनी तांतडी मूळ केलें ॥ ७ ॥

॥ ६७८६ ॥ सावडीं कांडण ओवी नारायण । निवडे आपण भूस सार ॥ १ ॥ मुसळ आधारीं आवरूनी धरीं । सांवरोनी थिरीं घाव घाली

२ ॥ वाजती कांकणें अनुहात गजरें । छंद माहियेरे गाऊं गीति ॥ ३ ॥
डितां कांडण नव्हे भाग शीण । तुजमजपण निवडे तों ॥ ४ ॥ तुका ह्म-
रूप उमटे आरिसा । पाक त्या सरिसा शुद्ध झाला ॥ ५ ॥

आडसण दळण. अभंग.

॥ ६७८७ ॥ शुद्धीचें सारोनी भरियेली पाळी । भरडोनी वोंगळी नाम
ऊं ॥ १ ॥ आडसोनी शुद्ध करीं वो साजणी । सिद्ध कां पापिणी नासि-
ं ॥ २ ॥ सुपीं तोंचि पाहें धड उगटिले । नव्हता नासिले जगझोडी
ीं तोंचि आहे तुज तें आधीन । दळिल्या जेवण जैसें तैसें ॥ ४ ॥
पीं तोंचि संग घेई धडफुडी । एकसा गधडी नास केला ॥ ५ ॥ दळितां
दळे तुज कां न कळे । काय गेले डोळे कान तुझे ॥ ६ ॥ सुपीं तोंचि
ज न करितां सायास । पडसी सांदीस तुका ह्मणे ॥ ७ ॥

दळण. अंभग.

॥ ६७८८ ॥ शुद्ध दळणाचें सुख सांगों काई । मानवीत सईबाई तुज
॥ १ ॥ शुद्ध तें वळण लवकरी पावे । डोलवितां निवे अष्टांग तें ॥ २ ॥
शुद्ध हें जेवितां तन निवे मन । अल्प त्या इंधन बुडा लागे ॥ ३ ॥ शुद्ध
याचा पाक सुचित चांगला । अविट तयाला नाश नाहीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे
शुद्ध आवडे सकळां । भ्रतार वेगळा न करी जीवें ॥ ५ ॥

॥ ६७८९ ॥ उपजोनियां पुढती येऊं । काला खाऊं दहींभात ॥ १ ॥
वैकुंठीं तों ऐसें नाहीं । कवळ कांहीं काल्याचें ॥ २ ॥ एकमेकां देऊं मुखीं ।
सुखीं घालूं हुंबरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाळवंट ॥ बरवें नीट उत्तम ॥ ४ ॥

॥ ६७९० ॥ याल तर या रे लागें । अवघें माझ्या मागें मागें ॥ १ ॥
आजी देतों पोटभरी । पुरे ह्मणाल तोंवरी ॥ २ ॥ हळूहळू चला । कोणी
कोणाशीं न बोला ॥ ३ ॥ तुका ह्मणे सांडा घाटे । तेणें नका भरूं पोटें ॥ ४ ॥

॥ ६७९१ ॥ शिंकें लावियेलें दुरी । होतों तिघांचे मी वरी ॥ १ ॥
तुह्मी व्हा रे दोहींकडे । मुख पसरूनी गडे ॥ २ ॥ वाहती या धारा । घ्या रे
दोहींच्या कोंपरा ॥३॥ तुका ह्मणे हातीं टोका । अधिक उणें नेदी एका॥४॥

॥ ६७९२ ॥ शुद्ध बीजा धान्य आडसुनी काढी । पाखडोनि सांडी भूस सर्व ॥ १ ॥ निसोनियां वाई सांडी सर्व खडे । करूनियां झाडे संचिताचे ॥ २ ॥ देऊनियां घाव मागतो गोंडाळ । वेंचूनी समूळ रज काढी ॥ ३ ॥ घोळुनीयां घोळ ठेवी एकी सवा । सांचूनियां घावा घाव सासी ॥ ४ ॥ आंतील जो कण तयामाजी रेती । वेंचूनी परती त्यागावी ते ॥ ५ ॥ तुका ह्मणे तेव्हां दळणा सारिला । नाहीं तरी केला लाज फार ॥ ६ ॥

॥ ६७९३ ॥ निवडावे खडे । तरी दळण वोजें घडे ॥ १ ॥ नाहीं तरी नासोनि जाय । कारण आळस उरे हाय ॥ २ ॥ निवडावें तन । सेतीं करावें राखण ॥ ३ ॥ तुका ह्मणे नीत । न विचारितां नव्हे हित ॥ ४ ॥

॥ ६७९४ ॥ पळाले ते भ्याड । त्यांसी येथें झाला नाड ॥ १ ॥ धीट घेती धणीवरी । शिंकीं उतरितो हरी ॥ २ ॥ आपुलिया मतीं । पडलीं विचारींतीं रितीं ॥ ३ ॥ तुका लागे घ्या रे पायां । कैं पावाल या ठाया ॥ ४ ॥

॥ ६७९५ ॥ घालें मग पोट । केला गड्यांनीं बोभाट ॥ १ ॥ ये रे ये रे नारायणा । बोलों अबोलण्या खुणा ॥ २ ॥ खांद्यावरीं भार । तीं शिणती बहु फार ॥ ३ ॥ तुकयाच्या दातारें । नेलीं सुखी केलीं पोरें ॥ ४ ॥

॥ ६७९६ ॥ पाहती गौळणी । तंव पालथी दुधाणी ॥ १ ॥ ह्मणती नंदाचिया पोरें । आजी चोरी केली खरें ॥ २ ॥ त्याविण हे नासी । नव्हे दुसरिया ऐसी ॥ ३ ॥ सर्वे तुका मेळा । त्याणें अगुणा आणिला ॥ ४ ॥

॥ ६७९७ ॥ आतां ऐसें करूं । दोघां धरूनियां मारूं ॥ १ ॥ मग टाकिती हे खोडी । तोंडीं लागली ते गोडी ॥ २ ॥ कोंडूं घरामधीं । न बोलोनी जागों बुद्धी ॥ ३ ॥ बोलवितो देवा । तुका गडियांचा मेळावा ॥ ४ ॥

॥ ६७९८ ॥ गडी गेले रडी । कान्हो नेदीस तूं चढी ॥ १ ॥ आह्मी न खेळों न खेळों । आला भाव तुझा कळों ॥ २ ॥ न साहावे भार ॥ बहु लागतो उशीर ॥ ३ ॥ तुका आला रागें । येऊं नेदी मागें मागें ॥ ४ ॥

हाल. अभंग.

॥ ६७९९ ॥ यमुने तटीं मांडिला खेळ । ह्मणे गोपाळ गडियांसी ॥ १ ॥ हाल महाहाल मांडा । वाउगी सांडा मोकळी ॥ २ ॥ नांवें ठेवूनि

वांटा गडो । न वजे रडी मग कोणी ॥ ३ ॥ तुका म्हणे कान्हो तिळतांद-
ळ्या । जिंके तो करी आपुला खेळश ॥ ४ ॥

॥ ६८०० ॥ वळें डाई न पडे हरी । बुद्धि करी शाहाणा तो ॥ १ ॥
मोकळें देवा खेळों द्यावें । सम भावें सांपडावया ॥ २ ॥ येतो जातो वेळो-
वेळां । न कळे कळा सांपडती ॥ ३ ॥ तुका म्हणे धरा ठायींच्या ठायीं ।
मिठी जीवीं पायीं घालूनियां ॥ ४ ॥

सुतुतू अभंग.

॥ ६८०१ ॥ जीवशिवाच्या मांडूनि हाला । अहं सोहं दोन्ही भेदती
भला ॥ १ ॥ घाली सुतुतू फिरोनि पाही आपुणासी । पाही बळिया तो
मागिला तुटी पुढिलासी ॥ २ ॥ खेळिया तो हाल सांभाळी । धुम घाली तो
पडे पाताळीं ॥ ३ ॥ बळिया गांड्या तोचि खेळे । दम पुरे तो वेळोवेळां
खेळे ॥ ४ ॥ हातीं पडे तोचि ढांग । दम पुरे तो खेळिया चांग ॥ ५ ॥
मागें पुढें पाहे तो जिंके । हातीं पडे तोचि आधार फिके ॥ ६ ॥ आपल्या
बळें खेळे रे भाई । गडियाची सांडोनी सोई ॥ ७ ॥ तुका ह्मणे मी खेळि-
या नव्हें । जिकडे पडें त्याचि सर्वें ॥ ८ ॥

॥ ६८०२ ॥ अनंत ब्रह्मांडें उदरीं । हरि हा बाळक नंदा घरीं ॥ १ ॥
नवल केव्हडें केव्हडें । न कळे कान्होबाचें कोडें ॥ २ ॥ पृथ्वी जेणें तृप्त
केली । त्यासी यशोदा भोजन घाली ॥ ३ ॥ विश्वव्यापक कमळापति ।
त्यासी गौळणी कडिये घेती ॥ ४ ॥ तुका ह्मणे नटधारी । भोग भोगून
ब्रह्मचारी ॥ ५ ॥

॥ ६८०३ ॥ कृष्ण गोकुळीं जन्मला । दुष्टां चळकांप सुटला ॥ १ ॥
होतां कृष्णाचा अवतार । आनंद करिती घरोघर ॥ २ ॥ सदा नाम वाचे
गाती । प्रेम आनंदें नाचती ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरती दोष । आनंदानें क-
रिती घोष ॥ ४ ॥

॥ ६८०४ ॥ मेळवूनी सकळ गोपाळ । कांहीं करिती विचार ॥ १ ॥
चला जाऊं चोरूं लोणी । आजी घेऊं चंद्रधणी ॥ वेळ लावियेला अझुणी ।
एकाकरितां गडे हो ॥ २ ॥ वाट काढिली गोविंदीं । मागें गोपाळांची मां-

दी ॥ ३ ॥ अवघाचि बावरे । कळों नेदी कोणा फिरे ॥ ४ ॥ बरं पाहोनि एकांताचें । नवविधा नवनीताचें ॥ ५ ॥ रिघे आपण भीतरी । पुरवी माथुलियाच्या हरी ॥ ६ ॥ बोलों नेदी ह्मणे स्थीर । खुणा दावी खा रे क्षीर ॥ ७ ॥ जोगावल्यावरी । तुका करितो चाकरी ॥ ८ ॥

॥ ६८०५ ॥ धन्य त्या गौळणी इंद्राच्या पूजनीं । नैवेद्य हिरोनी खातो कृष्ण ॥ १ ॥ अरे कृष्णा इंद्र अमर इच्छिती । कोण तयांप्रति येईल आतां ॥ २ ॥ तुका ह्मणे देव दाखवी विंदान । नैवेद्य खाऊन हासों लागे ॥ ३ ॥

॥ ६८०६ ॥ तुह्मी गोपी बाळा मज कैसा नेणा । इंद्र अमरराणा म्यांचि केला ॥ १ ॥ इंद्र चंद्र सूर्य ब्रह्मा तिन्ही लोक । माझे सकळीक यम धर्म ॥ २ ॥ मजपासूनियां झाले जीव शिव । देवांचा ही देव मीच कृष्ण ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्यांसी बोले नारायण । व्यर्थ मी पाषाण जन्मा आलों ॥ ४ ॥

॥ ६८०७ ॥ कां रे गमाविल्या गाई । आली वळती तुझी जाई ॥ मागें झालें काई । एका तें कां नेणसी ॥ १ ॥ केलास फजित । मागें पुढें ही बहुत ॥ लाज नाहीं नित्य । नित्य दंड पावतां ॥ २ ॥ बोला खोडा खिळ गाढी । ऐसा कोण तये काढी ॥ धांवेल का पाडी । तुझी आधीं वोढाळा ॥ ३ ॥ चाल धांवें । मी ही येतों तुजसवें ॥ तुका ह्मणे जंव । तेथें नाहीं पावली ॥ ४ ॥

॥ ६८०८ ॥ कंठीं धरिला कृष्णमणी । अवघा जनीं प्रकाश ॥ १ ॥ काला वांटूं एकमेकां । वैष्णवां निका संभ्रम ॥ २ ॥ वांकुलिया ब्रह्मादिकां । उत्तम लोकां दाखवूं ॥ ३ ॥ तुका ह्मणे भूमंडळीं । आह्मी बळी वीर गाढे ॥ ४ ॥

॥ ६८०९ ॥ कवळाचिया सुखें । परब्रह्म झालें गोरखें ॥ हात गोवूनि खाय सुखें । वोटासांदीं लोणचें ॥ १ ॥ कोण जाणे तेथें । कोण लाभ कां तें ॥ ब्रह्मादिकां दुर्लभ ॥ २ ॥ घाली हमामा हुंबरी । पांवा वाजवी मोहरी ॥ गोपाळांचे फेरी । हरि छंदें नाचतसे ॥ ३ ॥ काय नव्हतें त्या घरीं खावया । रिघे लोणी चोरावया ॥ तुका ह्मणे सर्वें तया । आह्मी ही सोंकलों ॥ ४ ॥

॥ ६८१० ॥ कान्होबा आतां तुह्मी आह्मीच गडे । कोणाकडे जाऊं नेदूं ॥ १ ॥ वाहीन तुझी भारशिदोरी । वळतीवरी येऊं नेदीं ॥ २ ॥ ढवळे

गाईचें दूध काढूं । एकएकल्यां ठोंवे मारूं ॥ ३ ॥ तुका ह्मणे टोकवूं त्यांला । जे तुझ्या बोला मानीत ना ॥ ४ ॥

॥ ६८११ ॥ बहु काळीं बहु काळीं । आह्मी देवाचीं गोवळीं ॥ १ ॥ नाहीं विटों देत भात । जेऊं बैसवी सांगातें ॥ २ ॥ बहु काळें बहु काळें । माझें पांघरे कांबळें ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं नाहीं । त्याचें आमचेंसें कांहीं ॥ ४ ॥

॥ ६८१२ ॥ बहु बरा बहु बरा । यासांगातें मिळे चारा ॥ १ ॥ म्हणोनी जीवेंसाटीं । घेतली कान्होबाची पाठी । बरवा बरवा दिसे । समागम याचा निमिषें ॥ ३ ॥ पुढती पुढती तुका । सोंकला सोंकवितो लोकां ॥ ४ ॥

॥ ६८१३ ॥ घेती पाण्यासी हुंबरी । त्यांचें समाधान करी ॥ १ ॥ ऐशी गोपाळांची सवे । जाती तिकडे मागें धांवे ॥ २ ॥ स्थिरावली गंगा । पांगविली म्हणे उगा ॥ ३ ॥ मोहरी पांवा काठी ॥ तुका म्हणे याजसाठीं ॥ ४ ॥

॥ ६८१४ ॥ वळी गाई धांवे घरा । आमच्या करी येरझारा ॥ १ ॥ नांव घेतां तो जवळी । बहु भला कान्हो बळी ॥ २ ॥ नेदी पडों उणें पुरें । म्हणे अवघेंचि बरें ॥ ३ ॥ तुका म्हणे चित्ता । वाटे न व्हावा परता ॥ ४ ॥

॥ ६८१५ ॥ म्हणती धालों धणीवरी । आतां न लगे शिदोरी ॥ नये क्षणभरी । आतां यासी विसंबों ॥ १ ॥ चाल चाल रे कान्होबा खेळ मांडूं रानीं । बैसवूं गोठणीं गाई जमा करूनी ॥ २ ॥ नलगे जावें घरा । चुकलिया येरझारा ॥ सज्जन सोयरा । मायबाप तूं आम्हां ॥ ३ ॥ तुका म्हणे धालें पोट । आतां कशाचा बोभाट ॥ पाहाणें तें वाट । मागें पुढें राहिली ॥ ४ ॥

॥ ६८१६ ॥ तुझिये संगती । झाली आमुची निश्चिती ॥ १ ॥ नाहीं देखिलें तें मिळे । भोग सुखाचे सोहळे ॥ २ ॥ वरी ताकाचें सरोवर । येथें नवनीताचे पूर ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां । आम्ही न वजों दवडितां ॥ ४ ॥

॥ ६८१७ ॥ कामें पीडिलों माया । बहु मारी नाहीं दया ॥ १ ॥ तुझ्या राहिलों आधारें । झालें अवघेंचि बरें ॥ २ ॥ तुझे लागलों संगती । आतां येतों काकुळती ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुझ्या भिडा । कान्होबा हे गेली पीडा ॥ ४ ॥

टिपरी. अभंग.

॥ ६८१८ ॥ खेळ मांडियेला वाळवंटीं घाई । नाचती वैष्णव भाई रे ॥ क्रोधें अभिमान केला पावटणी । एक एका लागतील पायीं रे ॥ १ ॥ नाचती आनंदकल्लोळीं । पवित्र गाणें नामावळी ॥ कळिकाळावरि घातलीसे कास । एक एकाहुनी बळी रे ॥ २ ॥ गोपीचंदनउटी तुळसीच्या माळा । हार मिरविती गळां ॥ टाळ मृदंग घाई पुष्पवरुषाव । अनुपम्य सुखसोहळा रे ॥ ३ ॥ लुब्धलीं नादीं लागली समाधि । मूढ जन नर नारी लोकां ॥ पंडित ज्ञानी योगी महानुभाव । एकचि सिद्धसाधकां रे ॥ ४ ॥ वर्णाभिमान विसरली याति । एकएकां लोटांगणीं जाती ॥ निर्मळ चित्तें झालीं नवनीतें । पाषाणा पाझर सुटती रे ॥ ५ ॥ होतो जयजयकार गर्जत अंबर । मातले हे वैष्णव वीर रे ॥ तुका ह्मणे सोपी केली पायवाट । उतरावया भवसागर रे ॥ ६ ॥

॥ ६८१९ ॥ एके घाई खेळतां न पडसी डाईं । दुचाळ्यानें ठकसी भाई रे ॥ त्रिगुणांचे फेरीं थोरे कष्टी होसी । या चौघांची तरी धरीं सोई रे ॥ १ ॥ खेळ खेळोनियां निराळाचि राहीं । सांडीं या विषयाची घाई रे ॥ तेणेंचि खेळें बसवंत होसी । ऐसें सत्य जाणें माझ्या भाई रे ॥ २ ॥ सिंपियाचा पोर एक खेळिया नामा । तेणें विठ्ठल बसवंत केला रे ॥ आपुल्या संवगडिया सिकवूनी घाई । तेणें सतंतर फड जागविला रे ॥ एक घाई खेळतां तो न चुकेचि कोठें । तया संत जन मानवले रे ॥ ३ ॥ ज्ञानदेव मुक्ताबाई वटेश्वर चांगा । सोपान आनंदें खेळती रे ॥ कान्हो गोवारी सांनीं बसवंत केला । आपण भोंवतीं नाचती रे ॥ सकळिकां मिळोनी एकी च घाई । त्याच्या ब्रह्मादिक लागती पायीं रे ॥ ४ ॥ रामा वसवंत कबिर खेळिया । जोडा बरवा मिळाला रे ॥ पांचा संवगडियां एकचि घाई । तेथें नाद बरवा उमटला रे ॥ ब्रह्मादिक सुरवर मिळोनियां त्यांनीं । तोही खेळ निवडिला रे ॥ ५ ॥ ब्राह्मणाचा पोर खेळिया एका भला । तेणें जन खेळकर केला रे ॥ जनार्दन बसवंत करूनियां । तेणें वैष्णवांचा मेळ मेळविला रे ॥ एकचि घाई खेळतां खेळतो । आपणचि बसवंत झाला रे ॥ ६ ॥ आणीक खेळिये होऊनियां गेले । वर्णावया वाचा मज नाहीं रे ॥ तुका ह्मणे गडे हो हुशारूनी खेळा । पुढिलांची धरूनियां सोई रे ॥ एकचि घाई खेळतां जो चुकला । तो पडेल संसारडाईं रे ॥ ७ ॥

॥ ६८२० ॥ बाराही सोळा गडियांचा मेळा । सतरावा बसवंत खे-ळिया रे ॥ जतिस पद राखों जेणें टिपरिया घांई । अनुहातें वायें मांदळा रे ॥ १ ॥ नाचत पंढरिये जाऊं रे खेळिया । विठ्ठल रखुमाई पाहूं रे ॥ २ ॥ सा चहूं वेगळा अठराही निराळा । गाऊं वाजवूं एक चाळा रे ॥ विसरती पक्षी चारा घेणें पाणी । तारुण्य देहभाव बाळा रे ॥ ३ ॥ आनंद तेथींचा मुकियासी वाचा । बहिरे ऐकती कानीं रे ॥ आंधळ्यांसी डोळे पांगुळांसी पाय । तुका ह्मणे वृद्ध होती तरणे रे ॥ ४ ॥

॥ ६८२१ ॥ दोन्ही टिपरीं एकचि नाद । सगुण निर्गुण नाहीं भेद रे ॥ कुसरी अंगें मोडितील परी । मेळविती एका छंदें रे ॥ १ ॥ कांहीं च न वजे वांयां रे । खेळिया एकचि बसवंत अवघियां रे ॥ सम विषम तेथें होऊंच नेदी । जाणऊनी आगळिया रे ॥ २ ॥ संत महंत सिद्ध खेळतील घाईं । तेच सांभाळी माझ्या भाई रे ॥ हात राखोन हाणिती टिपऱ्या । टिपरें मिळोन जाय त्याची सोई रे ॥ ३ ॥ विटाळाचें अवघें जाईल वांयां । काय ते शृंगारूनी काया रे ॥ निवडूनी बाहेर काढिती निराळा । जो न मिळे संतांचिया घाई रे ॥ ४ ॥ प्रकाराचें काज नाहीं सोडीं लाज । निःशं-क होऊनियां खेळें रे ॥ नेणतीं नेणतींच एके पावलीं मान । विठ्ठल नामा-चिया बळें रे ॥ ५ ॥ रोमांच गुढिया डोलविती अंगें । भावबळें खेळविती सोंगें रे ॥ तुका ह्मणे कंठ सद्गदित दाटे । या विठोबाच्या अंगसंगें रे ॥ ६ ॥

॥ ६८२२ ॥ यारे गडे हो धरूं घाई जाणतां ही नेणतां । नाम गाऊं टाळी वाहूं आपुलिया हिता ॥ १ ॥ फावलें तें घ्यारे आतां प्रेमदाता पांडु-रंग । आजी दिवस सोनियाचा वोडवला रंग ॥ २ ॥ हिंडती रानोरान भुजंगांत कांट्यावन । सुख तयांहून आह्मां गातां नाचतां रे ॥ ३ ॥ तुका ह्मणे ब्रम्हादिका सांवळें दुर्लभ सुखा । आजी येथें आलें फुका नाम मुखा कीर्तनीं ॥ ४ ॥

॥ ६८२३ ॥ भीमातीरीं एक वसलें नगर । त्याचें नांव पंढरपुर रे ॥ तेथील मोकासी चार भुजा त्यासी । बाइला सोळा हजार रे ॥ १ ॥ नाचत जाऊं साच्या गांवा रे खेळिया । सुख देईल विसांवा रे ॥ पुढें गेले ते निधाई झा-ले । वाणितील साची सीमा रे ॥ २ ॥ बळिया आगळा पाळी लोकपाळां । रीघ नाहीं कळिकाळा रे ॥ पुंडलीक पाटील केली कुळवाडी । तो झाला भवदुःखा वेगळा रे ॥ ३ ॥ संतसज्जनीं मांडिलीं दुकानें । जया जें पाहिजे

तें आहेरें ॥ भुक्तिमुक्ति फुकाच साठीं । कोणी तयांकडे न पाहे रे ॥ ४ ॥ दोन्ही चोहाट भरले घनदाट । अपार मिळाले वारकरी रे ॥ न वजों ह्मणती आह्मी वैकुंठा । जिहीं देखिली पंढरी रे ॥ ५ ॥ बहुतदिस होती मज आस । आजी घडलें सायासीं रे ॥ तुका ह्मणे होय तुमचेनी पुण्यें । भेटी तया पायांसी रे ॥ ६ ॥

॥ ६८२४ ॥ पंढरी चोहटा मांडियेला खेळ । वैष्णव मिळोनी सकळ रे ॥ टाळ टिपरी मांदले एक नाद रे । झाला बळवंत देवकीचा बाळ रे ॥ १ ॥ चला तें कवतुक भाई रे । पाहों डोळां कामीं गुंतलेती काई रे ॥ भाग्यवंत कोणी गेले सांगाती । ऐसें सुख त्रिभुवनी नाहीं रे ॥ २ ॥ आनंदाचे वाद सुखाचे संवाद । एक एका दाविती छंद रे ॥ साही अठरा चारी घालुनियां घाई । नाचती फेरी टाळशुद्ध रे ॥ ३ ॥ भक्तीचीं भूषणें मुद्रा आभरणें । शोभती चंदनाच्या उट्या रे ॥ सत्व सुंदर कास घालुनि कुसरी । गर्जती नाम बोभाटीं रे ॥ ४ ॥ हरि हर ब्रह्मा तीर्थासहित भीमा । देव कोटी तेहतीस रे ॥ विस्मित होऊनि ठाकले सकळ जन । अमरावती केली ओस रे ॥ ५ ॥ वाणितील थोरी वैकुंठींचि परी । न पवे पंढरीची सरी रे ॥ तुकयाचा दास, ह्मणे नका आळस करूं । सांगतों नरनारींस रे ॥ ६ ॥

॥ ६८२५ ॥ ब्रह्मादिकां न कळे खोळ । ते हे आकळ धरिली ॥ १ ॥ मोहरी पांवा बाहे काठी । धांवे पाठीं गाईंचे ॥ २ ॥ उच्छिष्ट न लभे देवा । तें हें सदैवां गोवळयां ॥ ३ ॥ तुका ह्मणे जोड झाली । ते हे माउली आमुची ॥ ४ ॥

॥ ६८२६ ॥ कान्होवा तूं आलगट । नाहीं लाज बहु धीट ॥ पाहिलें वाईट । बोलोनियां खोटें ॥ १ ॥ परि तूं न सांडिसी खोडी । करिसी केली घडी घडी ॥ पाडिसी रोकडी । तुटी माये आह्मांसी ॥ २ ॥ तूं ठायींचा गोवळ । अविचारी अनर्गळ ॥ चोरटा शिंदळ । ऐसा पिटूं डांगोरा ॥ ३ ॥ जरी तुझी आई । आह्मी घालूं सर्वा ठायीं ॥ तुका ह्मणे तें ही । तुज वाटे भूषण ॥ ४ ॥

॥ ६८२७ ॥ भोजनाच्या काळीं । कान्हो मांडियेली आळी ॥ काला करी वनमाळी । अन्न एकवटा ॥ देई निवडूनी । माते ह्मणतो जननी ॥ हात पिटूनी मेदिनी । वरी अंग घाली ॥ १ ॥ कैसा आळी घेसी । नव्हे तेंचि करविसी ॥ घेई दुसरें तयेसी । वारी ह्मणे नको ॥ २ ॥ आतां काय करूं । नये